पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई I वर्ष: 06 I अंक: 2 I 16 जानेवारी 2024 I पृष्ठसंख्या: 36 I किंमत: 5 रू.





















## 2014-2024

# दशक विकासाचे



## अध्यक्षीय मनोगत

# विकासाच्या संकल्पाची सिद्धी

२०१४ मध्ये पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी आपले सरकार गरिबांसाठी समर्पित असेल, असे जाहीर केले होते. २६ मे २०१४ रोजी पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर श्री. मोदी यांनी आपला संकल्प साध्य करण्याच्या दिशेने एक-एक निर्णय घेणे सुरू केले. पंतप्रधान झाल्यानंतर स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून केलेल्या पहिल्याच भाषणात श्री. मोदी यांनी पंतप्रधान जन-धन योजनेची घोषणा केली. ही घोषणा देशातील गरीब कल्याणाचा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी मैलाचा दगड ठरणार आहे, याची कल्पना कोणालाच नव्हती. आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील कोट्यवधी नागरिकांचे बँकेत खातेही नव्हते. अशा सर्व गोरगरीब, वंचितांची सरकारी बँकांमध्ये जन-धन योजनेद्वारे खाती काढण्याचे पंतप्रधान मोदी यांनी जाहीर केल्यानंतर विरोधक, विचारवंत मंडळींनी नाके मुरडली. ज्या लोकांकडे पैसाच नाही, त्यांची बँक खाती काढून काय उपयोग, असा उपहासाचा सूर या मंडळींनी लावला होता. मात्र हीच योजना गोरगरिबांच्या जीवनात क्रांती घडवून आणणारी ठरेल, हे त्यांच्या गावीही नव्हते. केंद्र सरकार व राज्य सरकारांची गोरगरिबांसाठीची अनेक अनुदाने लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणे चालू झाल्यानंतर जन-धन योजना का सुरू करण्यात आली, हे लक्षात येऊ लागले. त्यानंतर पंतप्रधान आवास, उज्ज्वला, मातृ वंदना, पीक विमा, किसान निधी यासारख्या अनेक योजना केंद्र सरकारने सुरू केल्या. या योजनांद्वारे वंचित वर्गाला अर्थसहाय्य केले गेले. १९४७ ते २०१४ अशी ६७ वर्षे विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहिलेल्या समाजातील मोठ्या वर्गाला मोदी सरकारने बँकींग पर्यायाने अर्थव्यवस्थेच्या प्रवाहात सामावून घेतले. २०१४ पर्यंत गोरगरिबांसाठी अर्थसहाय्याच्या अनेक योजना सुरू झाल्या होत्या. मात्र त्याचे अनुदान, अर्थसहाय्य पदरात पाडून घेताना गोरगरिबांना झगडावे लागत होते. आपले हक्काचे पैसे मिळवण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांपुढे लाचेचा नेवैद्य ठेवावा लागत असे. हा नेवैद्य वाटल्यानंतर गोरगरिबांच्या वाट्याला एक रुपयातील ५-१० पैसेच राहत असत. भ्रष्टाचाराने सारी व्यवस्था पोखरली असल्याने सरकारी अनुदाने, अर्थसहाय्याची गळती प्रचंड प्रमाणात होत होती. मोदी सरकारने ही गळती थांबवली आणि गोरगरिबांना त्यांच्या वाट्याचे १०० टक्के अनुदान पोहचवणे सुरू केले. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर गेल्या १० वर्षात गरीब कल्याणासाठी घेतलेल्या अनेक निर्णयांचे फायदे संबंधित वर्गाला मिळू लागले आहेत. अशा मोजक्या निर्णयांचा आढावा या अंकात घेण्यात आला आहे. लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोदी सरकारचे प्रगती पुस्तक या अंकाद्वारे सादर झाले आहे. सध्या देशभर विकसित भारत संकल्प यात्रा सुरू आहे. या यात्रेद्वारे मोदी सरकारच्या कल्याणकारी निर्णयांची माहिती जनतेपर्यंत पोहचवली जात आहे. त्याचबरोबर या योजनांपासून कोणी वंचित राहिले असेल तर त्यांना या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाहीही केली जात आहे. मोदी सरकारचे प्रगती पुस्तक सर्वसामान्य कार्यकर्त्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारे आहे. गेल्या १० वर्षात मोदी सरकाने आरोग्य व्यवस्थेत केलेल्या बदलांची माहिती देणारा लेखही या अंकात आहे. मतदारांना सामोरे जाताना कार्यकर्त्यांना योजनांच्या माहितीची शिदोरी उपयुक्त ठरेल, असा विश्वास आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




०४ 2014-2024 दशक विकासाचे



०५ रेल्वे, रस्ते, विमानतळ- पायाभूत सुविधांचा जलद विकास



१८ अटल सेतू ही विकसित भारताची झलक




२१ महिलांनी विकसित भारताचे नेतृत्व करावे



२२ असा आहे अटल सेतू



२४ कष्ट, संयमाची फिनिक्स कथा !



संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp 9767335402

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (औरंगाबाद) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# 2014-2024- दशक विकासाचे



सरकार बदलले तरी आमच्या दररोजच्या जीवनात काय फरक पडणार, असा निराशावादी सूर अनेकजण व्यक्त करत असत. मोदी सरकारने गेल्या १० वर्षात आपल्या कारभारामुळे सामान्य माणसांच्या दैनंदिन जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. सामान्य माणसाचे जीवन सुखकर होण्यासाठी मोदी सरकारने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा कुशलतेने वापर केला. त्यामुळेच २०१४ ते २०२४ ही १० वर्षे सामान्य माणसाच्या दृष्टीने अभूतपूर्व ठरली.

**चला** तर मग, या दशकामधील संकल्प प्रत्यक्षात साध्य होत असल्याची साक्ष ठरणाऱ्या नववर्ष २०२४ मध्ये आपण नाणून घेऊयाकी, कशा पद्धतीने देशाने विकासाचे परिमाण आणि आदर्श–नमुने बदलले आहेत आणि नवीन परिवर्तनकारी सुधारणांनी नवीन भारताच्या निर्माणाची लिहिली आहे पटकथा...

हे दशक आहे विकासाचे! विकसित भारताच्या संकल्पाचे! २०१४ ते २०२४ या दशकाच्या कालखंडामध्ये स्वतंत्र भारतामध्ये लोकांच्या सहभागातून कार्य केले गेल्यामुळे हे सर्वात सशक्त दुशक बनले. जर लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टिकोणातून पाहिले तर, २०१४ ते २०२४ हे दशक विकसित भारताच्या विराट संकल्पाचा आधारस्तंभ बनले आहे. या दशकामध्ये एका सुविचारातून निश्चित केलेल्या लक्ष्याबरोबरच अमृत काळाच्या यात्रेला प्रारंभ केला आहे. राष्ट्रवादाला प्रेरणा, अंत्योदयाचे दर्शन आणि सुशासनाचा मंत्र बनवून देशाला नव्या उंचीवर घेऊन जाणे आणि सातत्याने प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर राहणे. या विचारांबरोबरच पहिल्यांदाच एखाद्या केंद्र सरकारने निश्चित समयबद्धतेने अगदी शेवटच्या टोकापर्यंत विकासाची गंगा पोहोचेल, हे सुनिश्चित केले. योग्य प्रकारे स्वातंत्र्याची जाणीव करून देण्याचा निश्चय केला आणि तो साकार करून दाखवला आहे. अशा काळामध्ये ज्यावेळी वर्ष २०२४ ला प्रारंभ झाला आहे, त्यावेळी जणू देश एक नवीन सूर्योदय होताना पहात आहे. याचा आधारस्तंभ गेल्या १० वर्षामध्ये तयार झाला आहे, त्याचे मोठे कारण म्हणजे, सर्व काही जे केले आहे, त्याची फळे अगदी अखेरच्या पायरीवर उभ्या असणाऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचली पाहिजेत, ही कसोटी पूर्ण केली गेली आहे. ■

# रेल्वे, रस्ते, विमानतळ- पायाभूत सुविधांचा जलद विकास

> २०१४ पासून भारताने जगामध्ये सर्वाधिक पायाभूत विकास निर्माण करण्यासाठी अभूतपूर्व कार्य केले. त्यामुळेच देशात सर्व क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा विकसित होत आहेत. मोदी सरकारचा काम करण्याचा वेग आणि अंमलबजावणी यांचा अंदाज लावण्यासाठी काही वर्षाची आकडेवारी पाहता येईल.



**२०१३-१४** मध्ये देशात प्रतिदिनी १२ किलोमीटर राजमार्ग तयार होत होते. आता वर्ष २०२२-२३ मध्ये प्रतिदिनी जवळपास २८ किलोमीटरपेक्षाही जास्त राजमार्गाचे काम होत आहे. २०१४ मध्ये देशातील ५ शहरांमध्ये मेट्रो रेलव्दारे संपर्क व्यवस्था होती. २०२३ मध्ये देशातील २२ शहरांमध्ये मेट्रो रेलद्वारे संपर्क व्यवस्था आहे. २०१४ मध्ये देशामध्ये जवळपास ७० विमानतळे कार्यरत होती. २०२३ मध्ये हा आकडा जवळपास १५० पर्यंत पोहोचला आहे. २०१४ मध्ये देशामध्ये जवळपास ३८० वैद्यकीय महाविद्यालये होती. २०२३ मध्ये हा आकडा ७०० पेक्षा अधिक झाला आहे. २०१४ मध्ये ग्राम पंचायतींपर्यंत फक्त ३५० किलोमीटर ऑप्टिकल फायबर लाइन टाकून ग्रामपंचायतींना जोडण्यात आले होते. २०२३ पर्यंत जवळपास ६ लाख किलोमीटर ऑप्टिकल फायबर लाइन टाकून ग्राम पंचायतींना जोडण्यात आले आहे. २०१४ मध्ये ५५ टक्के गावांना पीएम ग्राम सडक योजनेने जोडण्यात आले होते. त्यामध्ये विद्यमान केंद्र सरकारने ४ लाख किलोमीटरपेक्षा जास्त रस्ते बनवून हा आकडा ९९ टक्क्यांपर्यंत पोहोचवला आहे. २०१४ पर्यंत भारतामध्ये जवळपास २० हजार किलोमीटर रेल्वेलाइनचे विद्युतीकरण झाले होते. याचा अर्थ स्वातंत्र्यानंतर ७० वर्षांमध्ये केवळ २० हजार किलोमीटर रेल्वेलाइनचे विद्युतीकरण झाले होते. तर गेल्या १० वर्षामध्ये जवळपास ४० हजार किलोमीटर रेल्वे लाइनचे विद्युतीकरण झाले आहे. हे आजच्या भारताच्या काम करण्याचा वेग आणि यशस्वीतेचे प्रतीक आहे. प्रधानमंत्री घरकुल योजनेअंतर्गत ४ कोटींपेक्षा जास्त अधिक घरकुलांची निर्मिती करण्यासाठी मंजुरी दिली आहे. आज १३.७६ कोटींपेक्षा अधिक घरांमध्ये नळाव्द्वारे पेयजल मिळत आहे. नळाद्वारे पाणी पुरवठा होण्याचे प्रमाण याआधी फक्त १७ टक्के होते. ते आता ७० टक्के परिवारांपर्यंत पाणी पोहोचले आहे. स्वच्छतेअभावी होणाऱ्या नुकसानीचा, येणाऱ्या आजारपणाचा त्रास सर्वाधिक महिलांनाच भोगावा लागत होता. २०१४ च्या आधी गावांमध्ये स्वच्छतेचे प्रमाण केवळ ४० टक्के होते. आता 'स्वच्छ भारत मिशन' अंतर्गत सरकारकडून मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे देश १०० टक्के उघड्यावरील शौच मुक्त झाला आहे. याशिवाय, उज्ज्वला योजनेअंतर्गत १० कोटी स्वयंपाकाच्या गॅसची जोडणी देण्यास मंजुरी देण्यात आली आहे, त्यामुळे धूरमुक्त स्वयंपाकघर ही सरकारची ग्वाही संतृप्ततेच्या जवळ पोहोचली आहे. आज भारतामध्ये जवळपास १०० टक्के गावांमध्ये एलपीजी जोडण्या देण्यात आल्या आहेत. ■

# पंतप्रधान जनधन योजना



**स्वातंत्र्याच्या** या काळामध्ये एक योजना पुढे नेण्याचा संकल्प करण्यासाठी मी आपल्याकडे आलो आहे- प्रधानमंत्री जनधन योजना! या योजनेमधून आम्ही देशातल्या गरीबातील गरीब लोकांना बॅंक खात्याची सुविधा उपलब्ध करून देऊ इच्छितो. आज कोट्यवधी परिवार असे आहेत की, त्यांच्याकडे मोबाइल फोन तर आहे, परंतु त्यांचे बॅंकेमध्ये खाते नाही. ही परिस्थिती आपल्याला बदलायची आहे. देशाच्या आर्थिक संसाधनाचा गरीबालाही उपयोग झाला पाहिजे, याचा प्रारंभ इथूनच होत आहे. म्हणूनच या योजनेमध्ये जी बंक खाती उघडली जातील, त्यांना डेबिट कार्ड दिले जाईल. त्या डेबिट कार्डाबरोबर प्रत्येक गरीब कुटुंबाला एक लाख रूपयांचा विमा सुनिश्चित केला जाईल. यामुळे जर त्याच्या जीवनामध्ये काही संकट आले, तर त्या व्यक्तीच्या कुटुंबियांना एक लाख रूपयांची विमा भरपाई मिळू शकेल.

## संकल्प सिद्धी

- नोव्हेंबर २०२३ पर्यंत ५१.०४ कोटी खाती, जनधन योजनेतून उघडण्यात आली.
- महिलांची २८.२९ कोटी खाती उघडण्यात आली.
- ३४.०४ कोटी खाती ग्रामीण आणि निम्नशहरी क्षेत्रांमध्ये उघडण्यात आली.
- ३४.६३ कोटी खात्यांना 'रूपे डेबिट कार्ड' जारी करण्यात आली.
- ऑगस्ट २०१५ मध्ये १७.९ कोटी जनधन खाती होती. हा आकडा वाढून नोव्हेंबर, २०२३ पर्यंत जवळपास ५१ कोटी झाला.

## बदलत्या भारतामध्ये योगदान

- स्वातंत्र्याला ६८ वर्षे झाल्यानंतरही म्हणजे २०१४ पर्यंत देशातल्या ६८ टक्के लोकसंख्येला बॅंकिंग सुविधा मिळू शकली नव्हती.
- ऑगस्ट,२०१४ मध्ये प्रत्येक कुटुंबाला बॅंकिंग व्यवस्थेबरोबर जोडण्याचे लक्ष्य निश्चित करून योजना सुरू. १४ ऑगस्ट, २०१८ रोजी प्रत्येक प्रौढ व्यक्तीला बॅंकेबरोबर जोडण्याच्या दूरदृष्टीने योजनेचा विस्तार, जवळपास ५१ कोटी बंक खाती उघडण्यात आली.
- जनधन योजना ही केंद्र सरकारच्या लोक केंद्रीत आर्थिक उपक्रमांची आधारशिला बनली. मार्च २०१४ ते मार्च २०२० पर्यंत उघडण्यात आलेल्या प्रत्येक दोन खात्यांपैकी एक खाते वास्तविक, पीएमजेडीवाय खातेच होते.
- कोविड काळामध्ये जनधन खात्यामुळेच लोकांपर्यंत थेट लाभ पोहोचवता आला. गावांमध्ये कोविडच्या विरोधातील लढ्यात या खात्यांचेही कौतुकास्पद योगदान होते.
- लॉकडाउन लावण्यात आल्यानंतर १० दिवसाच्या आतच जवळपास २० कोटी महिलांच्या खात्यांमध्ये डीबीटीच्या माध्यमातून मासिक ५०० रूपयांची वित्तीय मदत पाठविण्यास प्रारंभ केला.
- जनधन योजनेबरोबरच 'जॅम'-त्रिवेणी म्हणजे जनधन-आधार-मोबाइल यांना संलग्न केल्यामुळे फसवणुकीचे प्रकार थांबले. भ्रष्टाचाराला आळा घालून लाभार्थींपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवला.
- डीबीटीच्या माध्यमातून बॅंक खात्यांमध्ये ३२ लाख कोटी रूपयांपेक्षा अधिक निधी हस्तांतरित करून कोट्यवधी गरीब लाभार्थ्यांना दिला. डीबीटीमुळे सरकारने २.७३ लाख कोटी रूपये वाचवले.
- ऑक्टोबर, २०२३ पर्यंत देशामध्ये ६,०१, ३२८ 'मॅप' करण्यात आलेल्या गावांपैकी ५,९९,७९१ (९९.७४टक्के) म्हणजे जवळ जवळ शंभर टक्के गावांमध्ये बॅंकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.
- या खात्यांमध्ये ऑगस्ट, २०१५ मध्ये २२.९१ कोटी रूपये जमा होते. हा आकडा पुढे २.०९ लाख कोटींपर्यंत पोहोचला. फक्त ८.२ टक्के खात्यांमध्येच शून्य शिल्लक आहे.

# स्टार्टअप इंडिया



STARTUP INDIA
STAND UP INDIA

**स्टार्टअप** इंडिया ही योजना नसून एक उपक्रम आहे, जो देशात नवोन्मेष, स्टार्टअप्सना प्रोत्साहन आणि गुंतवणूकीसाठी एक मजबूत परिसंस्था तयार करण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली आहे. भारतातील तरुण नोकरी शोधण्याऐवजी रोजगार निर्माते व्हावेत. एखाद्या स्टार्टअपने केवळ पाच जणांना रोजगार दिला, तरी ती देशाची मोठी सेवा ठरेल.

## संकल्प सिद्धी

- १.१६ लाख स्टार्टअप्सना डिसेंबर २०२३ पर्यंत मिळाली मान्यता.
- १० लाख नोकऱ्या, स्टार्टअप इंडिया सुरू झाल्यापासून निर्माण झाल्या आहेत.
- २६.५ हजारापेक्षा जास्त संस्थांना २०२२ मध्ये मिळाली मान्यता.
- २३ लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नोकऱ्या टेक स्टार्टअपद्वारे निर्माण झाल्या आहेत. २०१७ ते २०२१ या कालावधीत असे नॅसकॉमच्या पाहणी अहवालात म्हटले आहे.

## बदलत्या भारतामध्ये योगदान

- भारतासाठी नवोन्मेष आणि भारतातून नवनिर्मितीचा मंत्र घेऊन भारतीय स्टार्टअप्स केवळ जगाचे नेतृत्व करत नाहीत, तर नव्या भारताचे आधारस्तंभही बनत आहेत.
- २०१४ साली सध्याच्या नेतृत्वाने कामाला सुरूवात केली, तेव्हा देशात स्टार्टअप हा शब्द फारसा ऐकू येत नव्हता. ५०० पेक्षा कमी स्टार्टअप होते. पण एका दशकापेक्षा कमी कालावधीत भारतातील स्टार्टअप्सचे विश्व बदलले आहे.
- जागतिक स्तरावर १.१६ लाख स्टार्ट अप्ससह भारत तिसरी सर्वात मोठी परिसंस्था बनला आहे.
- २०१६-१७ सालापर्यंत, भारतात दरवर्षी सुमारे एका युनिकॉर्नची भर पडत असे, आता सुमारे ६६ टक्के वाढीसह दरवर्षी अतिरिक्त युनिकॉर्नची भर पडत आहे.
- देशातील युनिकॉर्नची संख्या ११५ वर पोहोचली आहे, ज्यांचे मूल्य ३५० अब्ज डॉलरपेक्षा जास्त आहे. जगातील दर१० पैकी एक युनिकॉर्न भारतात तयार होत आहे.
- भारतातील स्टार्टअप्स आज ५५ पेक्षा जास्त विविध उद्योगांसह काम करतात.
- स्टार्टअप इंडिया कृती आराखड्याला मूर्त रूप देण्यासाठी, स्टार्टअप इंडिया बीज नीधी योजना आणि स्टार्टअपच्या सहाय्यासाठी पतहमी योजना लागू करण्यात आली आहे.
- स्टार्टअपची वाढती ताकद आणि कार्यसंस्कृती प्रत्येक भागात पोहोचवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १६ जानेवारी रोजी राष्ट्रीय स्टार्टअप दिवस साजरा करण्याची घोषणा केली.
- भारताच्या अध्यक्षतेखाली जी-२० मध्ये पहिल्यांदाच स्टार्टअप २० हा सहयोगी गट स्थापन करण्यात आला.
- अवघे जग भारतीय स्टार्टअप्सकडे भवितव्य म्हणून पाहत आहे. देशात प्रथमच इस्रोने खाजगी रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण करणे, हा भारतातील स्टार्टअप्सच्या उदारमतवादी धोरणाचा दाखला आहे.

# आयुष्मान भारत




**आपला** हा शतकांपूर्वीचा संकल्प या शतकात आपल्याला पूर्ण करायचा आहे. समाजाच्या अगदी तळागाळातील व्यक्तीला, गरीबातील गरीब व्यक्तीला उपचार आणि चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात. हे स्वप्न साकार करण्यासाठी बिरसा मुंडा यांच्या या भूमीतून आयुष्मान भारतच्या रूपाने महत्त्वाचे पाऊल उचलले जात आहे.

**– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

## संकल्प सिद्धी

● ५५ कोटीपेक्षा जास्त लोकांना ५ लाख रुपयापर्यंत मोफत उपचार सुविधा.

● २८.३० कोटी आयुष्मान कार्डस्, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत तयार करण्यात आली.

## बदलत्या भारतामध्ये योगदान

● ५ लाख रूपयांपर्यंतचा आरोग्य विमा प्रदान करणारी ही जगातील सर्वात मोठी योजना आहे. एवढी मोठी योजना जगातील कोणत्याही देशात सरकारी पैशाने चालवली जात नाही.

● या योजनेत कर्करोग, हृदयरोग, किडनी, यकृत यासह अनेक आजारांवरील उपचारांचा समावेश आहे.

● १.६० लाखांपेक्षा जास्त आयुष्मान भारत आरोग्य आणि स्वास्थ्य केंद्रे देशातील खेड्यापाड्यात पोहोचली आहेत.

● दहा हजार जन औषधी केंद्रे सुरू करण्यात आली, तिथे ९०% पर्यंत औषधे परवडणाऱ्या दरात उपलब्ध होतात. अमृत फार्मसीमधून स्वस्त औषधे खरेदी करून ३ कोटीपेक्षा जास्त नागरिकांचे पैसे वाचवले.

● मिशन इंद्रधनुषच्या माध्यमातून ५.६५ कोटीपेक्षा अधिक माता आणि बालकांना लस संरक्षण मिळाले. कोविडमध्ये २२० कोटीपेक्षा जास्त लसीचे डोस देण्यात आले.

● १५ नवीन एम्स आणि सुमारे ३०० वैद्यकीय महाविद्यालये नव्याने सुरू करण्यात आली आहेत. ३७ कोटीपेक्षा जास्त डिजिटल आरोग्य ओळखपत्रे तयार करण्यात आली आहेत. आयुष्मान भारत डिजिटल मोहिमेअंतर्गत आरोग्य नोंदींचे डिजिटलायझेशन, २५ कोटीपेक्षा जास्त आभा म्हणजेच आयुष्मान भारत स्वास्थ्य खाती जोडली गेली.

● २०१४ पासून सुमारे वैद्यकीय महाविद्यालयातील ७० हजार जागा वाढवण्यात आल्या आणि दुरस्थ वैद्यकीय सल्ल्याने १५ कोटींचा टप्पा ओलांडला.

● १० वर्षात देशात 'एमबीबीएस'च्या जागाही एक लाखापेक्षा जास्त झाल्या आहेत. गेल्या काही वर्षामध्ये, देशातील पदव्युत्तर वैद्यकीय महाविद्यालयातील जागांची संख्या देखील ११०% ने वाढली आहे.

● २०२३ च्या अर्थसंकल्पात १५० पेक्षा जास्त परिचारिका (नर्सिंग) महाविद्यालये उघडण्याची घोषणाही करण्यात आली आहे.



# पंतप्रधान उज्ज्वला योजना



**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी संसदेतील आपल्या पहिल्या भाषणात आपले सरकार गरिबांसाठी समर्पित आहे, हे स्पष्ट केले होते. हे सरकार जे काही करेल ते गरिबांच्या भल्यासाठीच असेल. या दृष्टीकोनाला अनुसरून आई, मुलगी आणि सून यांनी स्वयंपाकघरातील धुरापासून मुक्त व्हावे, त्यांचा वेळ वाचवावा, पर्यावरणाचे रक्षण व्हावे, गॅस कनेक्शन तळागाळापर्यंत पोहोचावे, या विचारातून २५ कोटी कुटुंबे असणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणाऱ्या कुटुंबांच्या घरी स्वयंपाकाचा गॅस पोहोचवण्याची योजना सुरू करण्यात आली.

### उज्ज्वला योजनेसाठी पात्रता

- अर्जदार १८ वर्षांपेक्षा जास्त वयाची महिला असणे आवश्यक आहे. ती भारताची नागरिक असणे आवश्यक आहे.
- ती दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील असावी आणि घरातील इतर कोणाकडेही गॅस (एलपीजी) कनेक्शन नसावे.
- कुटुंबाचे एकूण मासिक उत्पन्न हे केंद्रशासित प्रदेश/राज्य सरकारांनी निर्धारित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त नसावे.
- अर्जदाराचे नाव SECC-२०११ च्या यादीमध्ये असले पाहिजे आणि ते तेल विपणन कंपन्यांच्या दारिद्र्यरेषेखालील नागरिकांच्या डेटाबेसमध्ये प्रदान केलेल्या माहितीशी देखील जुळले पाहिजे.
- अर्जदाराने शासनाने प्रदान केलेल्या इतर कोणत्याही समान योजनेंतर्गत नोंदणी केलेली नसावी.
- वरील व्यतिरिक्त, अर्जदाराने तिची बीपीएल स्थिती, ओळख इत्यादी दर्शविणाऱ्या कागदपत्रांचा संच देखील सादर केला पाहिजे.

### संकल्प सिद्धी

- सुमारे १० कोटी कुटुंबांना ५ डिसेंबर २०२३ पर्यंत स्वयंपाकाच्या गॅसची जोडणी देण्यात आली.
- ७५ लाख गॅस जोडण्या २०२५-२६ पर्यंत देण्यास मान्यता.

### बदलत्या भारतामध्ये योगदान

- १९५५ ते २०१४ पर्यंत देशात १४.५२ कोटी गॅस जोडण्या होत्या. उज्ज्वला योजना सुरू झाल्यापासून ८ वर्षापेक्षा कमी कालावधीत, सुमारे १० कोटी जोडण्या देण्यात आल्या आहेत.
- २०२२ सालापर्यंत, ४.४९ कोटी बनावट जोडण्या काढून टाकण्यात आल्या आहेत, परिणामी राष्ट्रीय तिजोरीतील ७१ हजार ३०१ कोटी रुपयांची बचत झाली आहे.
- केंद्र सरकारची धूरमुक्त स्वयंपाकघरांची हमी पूर्णत्वाच्या जवळ आहे. आज भारतातील जवळपास शतप्रतिशत गावात एलपीजी जोडण्या आहेत, पूर्वी हे प्रमाण सुमारे ५६% इतके होते.
- खर्च कमी झाला, महिलांना स्वावलंबी व्हायला वेळ मिळाला, कुटुंबाला शिक्षणासाठी वेळ मिळू लागला. तब्येत सुधारली. वेळेची बचत झाल्याने महिला इतर उपयुक्त कामात वेळ घालवू लागल्या.
- गॅसवरील अनुदान स्वेच्छेने सोडून देण्यास प्रोत्साहन देण्यात आले. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर कोट्यवधी लोकांनी अनुदानाचा त्याग केला, ज्यामुळे गरिबांना मोफत एलपीजी जोडणी देणे शक्य झाले.
- जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, लाकूड, कोळसा अशा पारंपारिक इंधनाचा वापर करून स्वयंपाक केल्याने भारतात दरवर्षी पाच लाख मृत्यू होतात. केंद्र सरकारच्या या प्रयत्नामुळे महिलांमधील संबंधित आजारांचे प्रमाण वीस टक्क्यांनी कमी झाले आहे.
- २०१८ साली जागतिक आरोग्य संघटनेच्या आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेने अभूतपूर्व या शब्दात उज्ज्वला योजनेचे वर्णन केले. आता जगासमोर आदर्श ठरलेल्या भारताच्या या यशाचा कित्ता घाना आणि बांगलादेशसारख्या देशांनीही गिरवला आहे.

# बेटी बचाओ, बेटी पढाओ



**देशाचे** पंतप्रधान भिक्षुक म्हणून तुमच्याकडे मुलींच्या आयुष्याची भीक मागत आहे. मुलींना आपल्या कुटुंबाचा अभिमान आणि राष्ट्राचा सन्मान समजा. या असंतुलनातून आपण फार लवकर बाहेर येऊ शकतो. मुलगा आणि मुलगी दोघेही समान आहेत, त्याशिवाय जीवनाची उंची गाठणे शक्य होणार नाही. जर तुम्हाला उंच भरारी घ्यायची असेल, तर तुमच्या स्वप्नांना मुलगा आणि मुलगी दोघांचे पंख हवेत, तरच तुमची स्वप्ने पूर्ण होतील. हा संदेश संपूर्ण देशाला समजेल. आपण सर्व मिळून देशाला भविष्यातील संकटातून वाचवू. **– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

## संकल्प सिद्धी

- ४ कोटीपेक्षा जास्त अधिक सुकन्या समृद्धी योजना खाती उघडली. सुमारे १.५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम जमा.
- १२.२८ कोटी मुलींचे नामांकन उच्च माध्यमिक वर्गापर्यंतच्या शालेय शिक्षणाच्या २०२१–२२ या शैक्षणिक वर्षात.
- राष्ट्रीय पोषण महिना आणि पोषण पंधरवड्यात ९० कोटीपेक्षा जास्त लोक चळवळींचे आयोजन करण्यात आले.
- बेटी बचाओ, बेटी पढाओच्या अंमलबजावणीनंतर १० वर्षे आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या मुलींमध्ये १५ टक्के पेक्षा अधिक वाढ झाली.
- २.०१ कोटीपेक्षा जास्त मुलींनी प्रथमच उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला.
- एप्रिल २०१५ पासून सुरूवात केलेल्या महिला हेल्पलाईनमार्फत. ६९.७५ लाखापेक्षा अधिक महिलांना मदत करण्यात आली.

## बदलत्या भारतामध्ये योगदान

- आपल्या मुलींची सामूहिक ताकद देशाला नव्या उंचीवर घेऊन जाईल. आज मुलींचे आर्थिक सक्षमीकरण होत आहे. हे लक्षात घेऊन बेटी बचाओ बेटी पढाओ योजना सुरू करण्यात आली.
- प्रत्येक पाऊल, प्रत्येक निर्णय आणि प्रत्येक टप्प्यावरील आव्हानांवर मात करण्यासाठी महिलांनी उपाय शोधले. जन्मापासून ते पोषण, शाळा, शिक्षण, नोकरी, सेवेत प्रवेश, राष्ट्रसेवा, उद्योजकता आणि कुटुंबात सुरक्षिततेची हमी मिळाली आहे.
- परिणामी एनएफएचएस पाचनुसार, संस्थागत प्रसुतीचे प्रमाण ८८.६% इतके झाले. लिंग गुणोत्तर २०१४ मध्ये ९१८ होते, ते २०२१–२२ मध्ये ९३४ पर्यंत वाढले.
- १८७६ मधील पहिल्या राष्ट्रीय जनगणनेनंतर प्रथमच, १००० पुरुषांमागे महिलांची संख्या अधिक होती. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार, प्रत्येक १००० पुरुषांमागे १०२० महिला आहेत.
- जम्मू–काश्मीरमधून तिहेरी तलाक, ३५ अ रद्द केल्यामुळे महिलांना मिळाला सुरक्षिततेचा अधिकार.
- खेलो इंडिया योजनेतील महिलांसाठी आणि लक्ष्य ऑलिम्पिक पोडियम योजनेंतर्गत महिला खेळाडूंना सहाय्य दिले जाते. टॉप्स अंतर्गत १०४ महिला खेळाडूंना मदत.
- सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० साठी गेली २ वर्षे सतत २० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी देण्यात आलाआहे. यामध्ये २ लाख अंगणवाड्यांना अद्ययावत केले जात आहे. पोषण अभियानाचे १० कोटीपेक्षा जास्त लाभार्थी आहेत.
- अंतराळात महिला शक्तीचा ध्वज भारतात १५ टक्के महिला वैमानिक आहेत, हे प्रमाण जगात सर्वोच्च आहे. नारी शक्ती वंदन कायद्याने महिलांना लोकसभा आणि विधानसभेत ३३ टक्के आरक्षणाचा अधिकार दिला आहे.
- १० कोटीपेक्षा अधिक महिला बचत गटात सहभागी झाल्या, २ कोटी महिलांना लखपती दीदी बनविण्याचा आहे संकल्प.

# शेतकरी हिताय



**शेतकऱ्यांचे** उत्पन्न वाढवणे, शेतीवरील खर्च कमी करणे, शेतकऱ्यांना बियाण्यापासून ते बाजारपेठेपर्यंतच्या आधुनिक सुविधा उपलब्ध करुन देणे, हे मोदी सरकारचे ध्येय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या संकल्पनेला ठोस स्वरूप देण्यासाठी आणि शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी शेतकऱ्यांसाठी प्रत्येक स्तरावर व्यवस्था मजबूत करण्यात आली. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड, पीक विमा, पीएम किसान सन्मान निधी, पीएम मानधन योजना आणि शेतकरी उत्पादक संघटना यासह विविध योजना सुरु करण्यात आल्या.

## संकल्प सिद्धी

- पीक विमा योजनेत ५५.४९ कोटी शेतकऱ्यांची नोंदणी.
- २४ कोटी मृदा आरोग्य कार्ड जारी, पोषणतत्वांच्या अधिकाधिक वापरासाठी २०१४-१५ मध्ये सुरुवात.
- २३.८३ लाख शेतकऱ्यांची पीएम मानधन योजनेत नोंदणी, वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यावर ३००० रुपये निवृत्तीवेतन मिळणार, वर्ष २०१९ मध्ये सुरूवात.
- पीक विमा दाव्यांवर शेतकऱ्यांना १.५० लाख कोटी रुपयांची नुकसानभरपाई देण्यात आली.
- २.८१ लाख रुपयांची रक्कम १५ हप्त्यांमध्ये ११.२७ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना अदा करण्यात आली.
- २८,६४८ प्राथमिक कृषी पतसंस्था प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्र म्हणून कार्यरत आहेत.

## बदलत्या भारतामध्ये योगदान

- भारतीय कृषी संशोधन परिषदेने अशा ७५ हजार शेतकऱ्यांच्या यशोगाथा एका पुस्तकाच्या स्वरूपात संकलित केल्या आहेत ज्यांनी त्यांच्या उत्पन्नात दुपटीहून अधिक वाढ केली आहे.
- शेतकऱ्यांच्या कल्याणाला आणि त्यांचे उत्पन्न वाढविण्याला दिलेले प्राधान्य यावरूनही कळू शकते की २०१३-१४ मध्ये सहकार मंत्रालय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग हे शेतकरी कल्याण मंत्रालयाचा भाग असताना, ३०,२२४ कोटी रुपये अर्थसंकल्पीय तरतूद होती. आता वेगळे झाल्यानंतर २०२३-२४ साठी अर्थसंकल्पीय तरतूद १.२५ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.
- दूध उत्पादनात ६१% ची विक्रमी वाढ, ८.५ लाख कोटी रुपये मूल्याचे दूध उत्पादन, ८ कोटी पशुपालक कुटुंबांना लाभ.
- किसान क्रेडिट कार्डद्वारे ७.५ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना ४% व्याजदराने ९ लाख कोटी रुपयांची कर्ज सुविधा.
- शेतकरी पीक विमा योजना अधिक परिणामकारक केल्यामुळे करून, शेतकरी सुरक्षित आणि निश्चिंत झाले, कारण अवकाळी पाऊस, वादळ, दुष्काळ, पूर किंवा कीटकांमुळे होणारे नुकसान अशा प्रत्येक परिस्थितीत आर्थिक नुकसान विमा केवळ दीड ते दोन टक्के प्रीमियमवर उपलब्ध होऊ लागला.
- पूर्वीच्या शेतकरी विमा योजनेचा लाभ २०% हून अधिक शेतकरी घेत नव्हते कारण त्यांना दाव्यापोटी नुकसानभरपाई मिळण्याची खात्री नव्हती. शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण करणाऱ्या अटी ज्यात रब्बी पिकांमध्ये दीड टक्के आणि खरीप पिकांवर दोन टक्के प्रीमियम कवच, दाव्यापोटीचे नुकसानभरपाई कवच हटवले.
- राष्ट्रीय निरंतर कृषी अभियानाचा घटक म्हणून २०१४-१५ मध्ये वर्षा सिंचन क्षेत्र विकास कार्यक्रमाची सुरुवात, यात ७.१३ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली
- वर्ष २०१४-१५ मध्ये सुरू झालेली परंपरागत कृषी विकास योजना ही देशात जैविक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू केलेली पहिली व्यापक योजना आहे.

यात ६.५३ लाख हेक्टर क्षेत्र समाविष्ट, १६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना लाभ. जैविक उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी www.Jaivikkheti.in/ या समर्पित पोर्टलचा प्रारंभ.

● शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी आणि कृषी कार्यातील अडचणी कमी करण्यासाठी, सन २०१४-१५ पासून मार्च २०२३ या कालावधीत कृषी यांत्रिकीकरण उप-अभियानांतर्गत शेतकऱ्यांना १५.२३ लाखांहून अधिक. यंत्रे आणि उपकरणे उपलब्ध करुन देण्यात आली. २३ हजार कस्टम हायरिंग सेंटर्स आणि २० हजारांहून अधिक फार्म मशिनरी बंक भाड्याने उपकरणे पुरवण्यासाठी स्थापन केली आहेत.

● नमो ड्रोन दीदी अंतर्गत, २०२४-२५ ते २०२५-२६ या कालावधीसाठी निवडक १४,५०० महिला स्वयं-सहायता गटांना ड्रोन प्रदान केले जातील. जास्तीत जास्त ८०% केंद्रीय सहाय्य असेल, उर्वरित रक्कम समूह स्तरावरील महासंघाकडून कर्ज स्वरूपात घेतली जाईल. यामुळे शेतकऱ्यांची कार्यक्षमता वाढण्यास, पीक उत्पादनात आणि परिचालन खर्च कमी करण्यास मदत होईल. मागील आर्थिक वर्षात, ५०० ड्रोन अग्रगण्य खत कंपन्या त्यांच्या स्वत:च्या संसाधनांमधून खरेदी करतील आणि निवडक स्वयं-सहायता गटांना देतील.

● कृषी क्षेत्रात ड्रोनला प्रोत्साहन देण्यासाठी ड्रोनवर अनुदान आणि ड्रोन भाड्याने देण्यास सुरुवात झाली.

● प्रति ड्रॉप मोअर क्रॉप (थेंबागणिक अधिक पीक) योजना २०१५-१६ मध्ये ठिबक आणि तुषार सिंचन प्रणालीद्वारे कृषी स्तरावर पाण्याच्या वापराची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी सुरू करण्यात आली होती. या योजनेंतर्गत लहान व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५% मदत मिळते. सुमारे १९ हजार कोटी रुपयांची केंद्रीय मदत, ७८.४ लाख हेक्टर क्षेत्र समाविष्ट, ७२.६ लाख शेतकरी लाभार्थी.

● सन २०२०-२१ मध्ये, नीती आयोगाने प्रति ड्रॉप मोअर क्रॉप योजनेच्या केलेल्या पाहणीत असे दिसून आले आहे की शेतकऱ्यांचे उत्पन्न १०% वरून ६९% पर्यंत वाढले आहे, पाणी वापर कार्यक्षमता ३०% वरून ७०% पर्यंत वाढली आहे आणि प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या.

● वर्ष २०१९-२० पासून आत्तापर्यंत, राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत १,२५९ स्टार्ट अप्सना मदत करण्यात आली आहे.

● देशातील अन्न उत्पादन २०१३-१४ मधील २६५.०५ दशलक्ष टनांवरून वाढून २०२२-२३ मध्ये विक्रमी ३२९.६९ दशलक्ष टन झाले. २०१४-१५ मध्ये उत्पादकता २०२८ किलोग्रॅम प्रति हेक्टर होती, ती २०२२-२३ मध्ये वाढून २४४८ किलोग्रॅम प्रति हेक्टर झाली.

● आत्मनिर्भर भारत अंतर्गत २०२० मध्ये १ लाख कोटी रुपयांचा कृषी पायाभूत सुविधा निधी सुरू करण्यात आला. यामध्ये ४२ हजारांहून अधिक प्रकल्पांसाठी ३२ हजार कोटी रुपये मंजूर करण्यात आले. या प्रकल्पांमुळे कृषी क्षेत्रात ५४,४८७ कोटी रुपये जमा झाले.

● एम.एस.स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींवर आधारित २०१८ मध्ये नवीन एमएसपी धोरण स्वीकारण्यात आले. वर्ष २०१८-१९ पासून खरीप, रब्बी आणि इतर पिकांसाठी सरासरी उत्पादन खर्चावर ५०% परताव्यासह एमएसपीमध्ये वाढ करण्यात आली. २०१३-१४ मध्ये धान १,३१० रुपये, प्रति क्विंटल होता जो २०२३-२४ मध्ये २,१८३ रुपये तर १,४०० रुपये प्रति क्विंटल असलेला गहू २,१२५ रुपये प्रति क्विंटल झाला.

● २८ जून २०२३ रोजी मंत्रिमंडळाने खतांचा पुरवठा, जागरूकता सृजन, पोषण आणि सुधारणेसाठी प्रधानमंत्री कार्यक्रम (पीएम-प्रणाम) मंजूर केला. ही योजना २०२३-२४ ते २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी आहे. गेल्या तीन वर्षाच्या सरासरीच्या तुलनेत खतांचा वापर कमी करून वाचलेल्या सरकारी अनुदानाच्या ५०% रक्कम त्या राज्याला अनुदान म्हणून दिली जाईल.

● ५०० मिलीच्या १७ कोटी बाटल्यांची वार्षिक क्षमता असलेली ३ नॅनो युरिया संयंत्र स्थापन करण्यात आली. ऑगस्ट २०२१ ते नोव्हेंबर २०२३ पर्यंत नॅनो युरियाच्या ६.७६ कोटी बाटल्या विकल्या गेल्या आहेत.

# एक भारत श्रेष्ठ भारत



**चाणक्यांनंतर,** भारताला एकसंध करण्यासाठी जर कोणी महापुरुषाने कोणतेही महत्त्वपूर्ण कार्य केले असेल तर ते सरदार वल्लभभाई पटेल होते. त्यामुळेच आज काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आपण भारत मातेचे स्मरण एकाच स्वरात करतो. देशाचे अखंडत्व राखण्यात सरदार साहेबांचा मोठा वाटा होता. त्यांनी आपल्याला एकसंध भारत दिला, आता श्रेष्ठ भारत घडवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आणि कर्तव्य आहे. एकसंध भारत श्रेष्ठ भारत होण्यासाठी सव्वाशे कोटी देशवासीयांचे सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत. **– पंतप्रधान नरेंद्र मोदी**

## संकल्प सिद्धी

● शिक्षण मंत्रालयाने एक भारत, श्रेष्ठ भारत उपक्रमांतर्गत युवा संगमचा तिसरा टप्पा सुरू केला.

● काशी तमीळ संगम, सौराष्ट्र तमीळ संगमचे आयोजन करण्यात आले होते.

● एक भारत श्रेष्ठ भारतचा दृष्टीकोन असा आहे की, प्रत्येक राज्याने दरवर्षी इतर कोणत्याही राज्याशी स्वत:ला निगडित केले पाहिजे.

● भारतीय रेल्वेने एक भारत श्रेष्ठ भारत मोहिमेत गौरव डिलक्स वातानुकूलित पर्यटक ट्रेनचे संचालन सुरू केले.

● पर्यटन मंत्रालयाने विविध राज्य सरकारे, केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार्याने १८ ऑगस्ट ते २० ऑगस्ट २०२३ या कालावधीत राजधानीत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाचे आयोजन केले होते.

## बदलत्या भारतामध्ये योगदान


● कला, संगीत, नृत्य, भोजन, क्रीडा इत्यादीसारख्या विविध उपक्रमांद्वारे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना परस्परांशी जोडतो आणि त्यांच्यातील सांस्कृतिक आणि भाषिक देवाणघेवाण समृद्ध करतो.

● देशाच्या एकात्मतेत भर घालणारा, देशातील इतर राज्ये जाणून घेणारा, इतर भाषा समजून घेणारा हा एक नैसर्गिक उपक्रम होत आहे.

● या कार्यक्रमांतर्गत, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जोडणीच्या संकल्पनेद्वारे विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील लोकांमधील परस्पर संवाद आणि परस्पर सामंजस्याला प्रोत्साहन दिले जात आहे.

● आपल्या अनेक संस्कृती, भाषा, पाककृती आणि वेशभूषा ही आपली ताकद आहे. भारताने शतकानुशतकेसह अस्तित्वातून प्रगती केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविधतेने भरलेल्या देशात सहअस्तित्व मजबूत करण्यासाठी अनेक उपक्रमांसह 'एक भारत श्रेष्ठ भारत' हे ब्रीदवाक्य दिले.

● देशातील नागरिक विशेषत: तरुण वर्ग एक भारत श्रेष्ठ भारत ही संकल्पना आपला जीवनमंत्र मानत आहेत.




वाराणसी येथे काशी तमिल संगमम् हा कार्यक्रम झाला.

# डिजिटल इंडिया



**डिजिटल** इंडिया म्हणजे सर्वांसाठी संधी, सर्वांसाठी सुविधा, सर्वांचा सहभाग. डिजिटल इंडियाचा अर्थ असा आहे की प्रत्येकाला सरकारी यंत्रणांमध्ये प्रवेश मिळू शकेल. डिजिटल इंडियाचा अर्थ पारदर्शक, भेदभाव रहित यंत्रणा आणि भ्रष्टाचाराला प्रतिबंध असा आहे. डिजिटल इंडियाचा अर्थ वेळ, श्रम आणि पैशाची बचत करणे हा होय. डिजिटल इंडिया म्हणजे जलद लाभ, संपूर्ण लाभ. डिजिटल इंडिया म्हणजे किमान सरकार, कमाल प्रशासन. हे दशक डिजिटल तंत्रज्ञानातील भारताच्या क्षमता, जागतिक डिजिटल अर्थव्यवस्थेत भारताचा वाटा मोठ्या प्रमाणावर वाढवणार आहे. त्यामुळे महान विशेषतज्ज्ञ या दशकाकडे भारताचे तंत्रज्ञान युग म्हणून पाहत आहेत.

## संकल्प सिद्धी

- अत्यावश्यक सरकारी सेवा, समाज कल्याण योजना, शिक्षण आणि कौशल्य विकास सेवा ५५.२० लाखांहून अधिक सामायिक सेवा केंद्रांवर उपलब्ध आहेत.
- चालू आर्थिक वर्षात नोव्हेंबर, २०२३ पर्यंत २७.१८ कोटींहून अधिक डिजिटल जीवन प्रमाणपत्रे (हयातीचा दाखला) जारी करण्यात आली, तर २०१४-१५ मध्ये एक लाख डीएलसी जारी करण्यात आली होती.
- सरकारी ई-बाजारपेठ GeM व्यापार चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या १४५ दिवसांत १ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे.
- डिजी लॉकरमध्ये ६२२ कोटींहून अधिक ही उपलब्ध आहेत, १८.३८ कोटी वापरकर्ते आहेत.
- उमंग ॲपवर ५.४८ कोटींहून अधिक वापरकर्ते नोंदणीकृत आहेत, १७०० हून अधिक सेवा उपलब्ध आहेत.

## बदलत्या भारतामध्ये योगदान

- डिजिटल इंडिया कार्यक्रम २०१५ मध्ये सुरू करण्यात आला.
- ऑगस्ट २०२३ मध्ये या कार्यक्रमाच्या विस्तारास मान्यता देण्याबरोबरच त्यासाठी १४,९०३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.
- ६.२५ लाख माहिती तंत्रज्ञान व्यावसायिकांना पुन्हा कौशल्याधारित करण्यासाठी, उमंग ॲपवर ५४० अतिरिक्त सेवा प्रदान करण्यासाठी, राष्ट्रीय सुपर कंप्यूटर अभियानांतर्गत आणखी ९ सुपर कंप्यूटर जोडण्यासाठी, तीन कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित उत्कृष्टता केंद्र उभारणीत मदत मिळेल.
- डिजिटल इंडिया संकल्पने अंतर्गत २.१० लाख ग्रामपंचायती ब्रॉडबँडने जोडल्या गेल्या आहेत. ई-पंचायत प्रकल्पात आतापर्यंत २.४९ लाख ग्रामपंचायतींनी चालू आर्थिक वर्षासाठी प्रकल्प सादर केले आहेत.
- कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने कुशल भारत डिजिटल नावाचा एक व्यापक प्लॅटफॉर्म सुरू केला आहे. केंद्र आणि राज्य सरकारचे सर्व प्रशिक्षण एकत्रित करण्यासाठी केंद्रीकृत हब तयार करण्याचा हा प्रयत्न आहे.
- मोबाईल फोन वापरुन चेहरा प्रमाणीकरण तंत्रज्ञानाद्वारे डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर करण्याची नवीन पद्धत सुरू करण्यात आली. याआधी, अंगठा, आयरिश तंत्रज्ञान वापरून डीएलसी सादुर करण्यात येत होते.
- ई-मार्केट प्लेस GeM वरून सरकारी खरेदीमुळे पारदर्शकता आली आहे. सरकारला वर्षाला ४० हजार कोटी रुपयांची बचत होण्याची अपेक्षा आहे. २०२२-२३ मध्ये २ लाख कोटीपेक्षा जास्त व्यवसाय.
- चालू आर्थिक वर्षात GeM वर ६९० कोटी रुपयांची उलाढाल. ३१ लाखांहून अधिक उत्पादने आणि २.५ लाखाहून अधिक सेवा येथे उपलब्ध आहेत.
- थेट खात्यात वर्ग केलेल्या सरकारी मदतीमुळे (डीबीटी) २.७३ लाख कोटी रुपये भ्रष्टाचारात वाया जाण्यापासून वाचवले गेले.

# पंतप्रधान जीवन ज्योती विमा




**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी रवींद्रनाथ टागोरांच्या कवितांचे स्मरण करुन सांगितले की, गरिबांना आधाराची नाही तर ताकदीची गरज आहे. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजनेत ही ताकद आहे. या देशात ८० ते ९० टक्के नागरिकांकडे कोणताही विमा नाही, तसेच त्यांच्याकडे निवृत्तीवेतन मिळण्याची सोयही नाही. या गोष्टी विचारात घेता १ मे रोजी प्रायोगित तत्वावर सुरू करण्यात आलेल्या या योजनेत अवघ्या ७ दिवसांत ५.०५ कोटी नागरिक सहभागी झाले.

## संकल्प सिद्धी

- १६.२ कोटींहून अधिक नोंदणी पीएमजेजेबीवायमध्ये
- ६ कोटींहून अधिक नोंदणी अटल पेन्शन योजनेत
- ३४.२ कोटींहून अधिक नोंदणी पीएमएसबीवायमध्ये
- १३.२९ कोटी रुपयांची मदत पीएमजेजेबीवायअंतर्गत विमा दाव्याच्या स्वरूपात ६.६४ लाख कुटुंबांना देण्यात आली.

प्रधानमंत्री जीवन ज्योति बीमा योजना

## बदलत्या भारतामध्ये योगदान

- भारत सरकारने २०१५ मध्ये एकाच वेळी तीन सामाजिक सुरक्षा योजना सुरू केल्या. यामध्ये प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा, सुरक्षा विमा, अटल पेन्शन योजना यांचा समावेश आहे.
- योजना सुरू झाली तेव्हा देशातील ८०-९० टक्के लोक विमा आणि निवृत्तिवेतनाच्या कक्षेबाहेर होते, परंतु आज ५६ कोटींहून अधिक लोक या तीन सामाजिक सुरक्षा योजनांमध्ये सामील झाले आहेत.
- पीएमजेजेबीवाय ही अशी जीवन विमा योजना आहे ज्यात कोणत्याही प्रकारे मृत्यू झाल्यास विमा कवच मिळते. याचा प्रतिवर्ष प्रीमियम ४३६ रुपये आहे. कोणत्याही प्रकारच्या मृत्यूच्या घटनेत दोन लाख रुपयांचे विमा कवच मिळते.
- पीएमएसबीवाय ही अपघात विमा योजना आहे जी अपघातात मृत्यू किंवा दिव्यांग झाल्यास विमा सुरक्षा कवच प्रदान करते. अपघातामुळे मृत्यू किंवा दिव्यांग झाल्यास प्रति वर्ष २० रुपये प्रीमियम भरून २ लाख रुपये आणि अंशतः विकलांगता आल्यास १ लाख रुपये विमा कवच मिळते.
- गरीब, वंचित आणि असंघटित कामगारांसह सर्व भारतीयांसाठी एक सार्वत्रिक सामाजिक सुरक्षा व्यवस्था निर्माण करण्यासाठी अटल पेन्शन योजना सुरू करण्यात आली. पात्रता: १८-४० दरम्यान वय, प्राप्तिकर दाता नसावा.
- राष्ट्रीय वयोश्री योजनेचा उद्देश कोणत्याही वयाशी संबंधित अपंगत्व असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना सहाय्यक जीवन साधने प्रदान करणे हा आहे. यामध्ये सुरुवातीपासून २०२३ पर्यंत सुमारे ३ लाख ज्येष्ठ नागरिकांना सहाय्यक उपकरणे देण्यात आली.
- वित्त अधिनियम २०१५ अंतर्गत ज्येष्ठ नागरिक कल्याण निधीची निर्मिती करण्यात आली, ज्यामध्ये ४०० कोटी रुपये हस्तांतरित करण्यात आले.
- पीएम वय वंदना योजना २१ जुलै २०१७ रोजी सुरू करण्यात आली ज्यामध्ये त्रैमासिक, सहामाही आणि वार्षिक निवृत्तिवेतनाची तरतूद एकरकमी गुंतवणुकीवर आधारित आहे. या योजनेत ६ लाखांहून अधिक ज्येष्ठ नागरिकांचा समावेश आहे.

# पीएम मुद्रा योजना



**मोठ्या** उद्योगांकडून अधिक रोजगार मिळतो, मात्र आपण बारकाईने पाहिले तर त्यात केवळ १.२५ कोटी रोजगार मिळतो. एवढ्या मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवले आहे, एवढा तामझाम आहे, मात्र या देशात छोटे काम करणारे ५.७० कोटी लोक १२ कोटी लोकांना रोजगार देतात. १.२५ कोटी लोकांना रोजगार देण्यासाठी अनेक यंत्रणा कार्यरत आहेत,मात्र १२ कोटी लोकांना रोजगार देणाऱ्यांना थोडी जरी मदत केली तर काय फरक पडू शकतो याची आपण कल्पना करू शकतो. मुद्रा योजनेचे उद्दिष्ट ज्यांच्याकडे पैसा नाही त्यांना पैसा उपलब्ध करून देणे' हे आहे. आतापर्यंत छोट्या उद्योजकांचे सावकारांच्या हातून शोषण झाले आहे, मात्र मुद्रा त्यांच्यात विश्वास निर्माण करेल की ते राष्ट्र उभारणीत योगदान देत आहेत आणि देश त्यांच्या प्रयत्नात त्यांना मदत करेल.

Pradhan Mantri mudra Yojna

### संकल्प सिद्धी

- २६.१२ लाख कोटी रुपयांचे ४६.२० कोटींहून अधिक कर्ज नोव्हेंबर २०२३ पर्यंत स्वीकृत.
- ६.२३ कोटी कर्जापैकी ४.५६ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम पीएम मुद्रा कर्जअंतर्गत २०२२-२३ मध्ये देण्यात आली.
- ६९ टक्के कर्ज महिला उद्योजकांना देण्यात आले.
- ११.९३ कोटीहून अधिक कर्ज ओबीसींना देण्यात आले.

### बदलत्या भारतामध्ये योगदान

- २० लाख कोटी रुपयांहून अधिक खर्च असलेल्या मुद्रा योजनेने युवकांसाठी स्वयंरोजगार, व्यवसाय आणि उद्योगाच्या संधी प्रदान केल्या आहेत.
- सुमारे आठ कोटी लोकांनी नवीन व्यवसाय सुरू केले आहेत, प्रत्येक उद्योजकाने एक-दोन जणांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.
- मुद्रा योजनेचा लाभ आठ कोटी नागरिकांना मिळाल्यामुळे ८-१० कोटी नवीन लोकांना रोजगार देण्याची क्षमता प्राप्त झाली आहे.
- राष्ट्रीय स्तरावर केलेल्या बृहत नमुना सर्वेक्षणानुसार पीएमएमवायने वर्ष २०१५ ते २०१८ पर्यंत १.२ कोटी रोजगार निर्माण करण्यात मदत केली होती.
- पीएम मुद्राला चालना देण्याच्या सरकारी धोरणामुळे लाखो एमएसएमई आता औपचारिक अर्थव्यवस्थेचा भाग बनले आहेत. यामुळे त्यांना चढ्या व्याजदराने कर्ज देणाऱ्या सावकारांच्या तावडीतून बाहेर पडण्यास मदत झाली आहे.
- मुद्रा लाभार्थ्यांच्या मालकीच्या आस्थापनांमध्ये ६६% वाटा शिशू श्रेणीच्या कर्जाचा, १९% किशोरवयीन श्रेणीचा आणि १५% युवा श्रेणीच्या कर्जाचा आहे.
- शिशु श्रेणीसाठी ५० हजार रुपयांपर्यंत, किशोरवयीन श्रेणीसाठी ५० हजार रुपयांपासून ते ५ लाख रुपयांपर्यंत आणि युवा श्रेणीसाठी ५ लाख ते १० लाख रुपयांपर्यंत दिले जाते.
- आर्थिक वर्ष २०१६-१७ पासून उपजीविका आणि उत्पन्न निर्मितीला चालना देणारे कृषी आणि त्याच्याशी संलग्न उपक्रम पीएमएमवायच्या कक्षेत आणण्यात आले आहेत.
- आर्थिक वर्ष २०१७-१८ पासून ट्रॅक्टर आणि पॉवर टिलरच्या खरेदीसाठी १० लाख रुपयांपर्यंतचे मंजूर कर्ज पीएमएमवायमध्ये समाविष्ट करण्यात आले.
- आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये व्यावसायिक उद्देशाने दिल्या जाणाऱ्या दुचाकी वाहन कर्जाचाही पीएमएमवायमध्ये समावेश करण्यात आला.

# जल जीवन मिशन



**स्वातंत्र्याला** ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. खूप सारी कामे आपापल्या पद्धतीने केली. पण हे देखील खरे आहे की आज भारतातील जवळपास निम्मी घरे अशी आहेत, ज्या घरांमध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. पिण्याच्या पाण्यासाठी त्यांना धडपड करावी लागत आहे. माता-भगिनींना डोक्यावर ओझे घेऊन, कळशी घेऊन दोन-दोन, पाच-पाच किलोमीटर जावे लागते. जीवनातील बहुतांश वेळ केवळ पाण्यासाठी खर्ची होतो. म्हणूनच सरकारने विशेष कार्य म्हणून जल जीवन अभियान हाती घेऊन पुढे जाण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र आणि राज्य सरकार एकत्र काम करतील. येत्या काही वर्षात ३.५ लाख रुपयांहून अधिक खर्च करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

### संकल्प सिद्धी

- १९.२४ कोटी ग्रामीण कुटुंबे देशात आहेत.
- १५ ऑगस्ट, २०१९ पर्यंत नळ जोडण्या ३.२३ कोटीच होत्या.
- १३.७६ कोटी ग्रामीण कुटुंबांना आता मिळत आहे, घरात नळाद्वारे पाणी.
- १०.५३ कोटीहून अधिक कुटुंबांना साडेचार वर्षांपेक्षा कमी कालावधीत देण्यात आल्या नवीन जोडण्या.
- १,९९,१५० गावांतल्या प्रत्येक घरात आत पोहोचले नळाद्वारे पाणी.
- २,१११ पेयजल चाचणी प्रयोगशाळा आहेत. त्यापैकी १३२४ ना एनएबीएलकडून मान्यता मिळाली आहे.
- जल जीवन मिशन लोकांना अनेक प्रकारे लाभान्वित करत आहे. घरात नळाच्या पाण्याच्या उपलब्धतेसह ग्रामीण भारतातील जीवनाच्या पद्धती बदलत आहेत.
- देशातील १.३५ लाख कुटुंबे असलेली एकूण १,२४५ गावे वगळता उर्वरित गावांना पाइपद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

### बदलत्या भारतामध्ये योगदान

- जागतिक आरोग्य संघटनेचा (डब्ल्यूएचओ) अंदाज आहे की भारतातील ग्रामीण घरांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठ्याची व्याप्ती पुरेपूर झाली तर दररोज ५.५ कोटी तासांपेक्षा जास्त वेळेची बचत होईल, जो वेळ सध्या घरातील महिला घरातील आवश्यक कामे किंवा प्रामुख्याने पाण्याची व्यवस्था करण्यासाठी खर्च करतात.
- 'डब्ल्यूएचओ'च्या अहवालानुसार सुरक्षितपणे पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन केल्यास देशात अतिसारामुळे होणारे ४ लाख मृत्यू टाळता येतील.
- संयुक्त राष्ट्र शाश्वत विकास उद्दिष्ट ६.१ चा उद्देश वर्ष २०३० पर्यंत सुरक्षित आणि परवडणारे पिण्याचे पाणी सर्वांपर्यंत आणि समान पद्धतीने उपलब्ध करुन देणे हा आहे. भारत सरकार २०२४ पर्यंत देशातील प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे पाणी पुरवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, जी एक सर्वोत्तम कामगिरी असेल.
- आयआयएम बंगळुरूला जेजेएमच्या रोजगार क्षमता आकलनात आढळले आहे की यामध्ये दरवर्षी २.८२ कोटी लोकांसाठी रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे.
- फील्ड टेस्ट किटद्वारे पाण्याचे नमुने तपासण्यासाठी २३.३६ लाख महिलांना प्रशिक्षण देण्यात आले. चालू आर्थिक वर्षात ८२ लाखांहून अधिक चाचण्या.
- नोबेल पारितोषिक विजेते प्राध्यापक मायकेल केमर यांनी अलिकडेच आपल्या शोधनिबंधाच्या निष्कर्षात लिहिले आहे की सुरक्षित पेयजलाच्या उपलब्धतेमध्ये देशातील १.३६ लाख बालकांचे (५ वर्षाखालील) दरवर्षी होणारे मृत्यू टाळण्याची क्षमता आहे, त्यामुळे बालमृत्यूच्या दरात ३०% घट होईल.

# अटल सेतू ही विकसित भारताची झलक



> महाराष्ट्र हा विकसित भारताचा भक्कम आधारस्तंभ बनला पाहिजे, यासाठी केंद्र शासनामार्फत सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. तसेच येत्या काळात देशातील २ कोटी महिलांना लखपती बनविण्याचा केंद्र शासनाचा संकल्प असून विकसित भारत संकल्प अभियानामध्ये महिलांनी नेतृत्व करुन या अभियानाला यशस्वी करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**नवी** मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या मैदानावर आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ३५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या अनेक विकास प्रकल्पांचे उदघाटन, राष्ट्राला समर्पण आणि पायभरणी करण्यात आली. यामध्ये अटल बिहारी वाजपेयी शिवडी न्हावा शेवा अटल सेतु, (२२.०० कि.मी.) (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (एम.टी.एच.एल.) खारकोपर-उरण रेल्वे लाईन प्रकल्प (१४.६० कि.मी.) ठाणे आणि ऐरोली दरम्यान 'दिघा गाव रेल्वे स्थानक' भारतरत्नम नेस्ट-१ भवन महानगर प्रदेशाच्या पश्चिम उप-प्रदेशासाठी सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना (क्षमता ४०३ द.ल.लि.) नवी मुंबई मेट्रो मार्ग-१ बेलापूर ते पेंढार (११.१० कि.मी., ११ स्थानके) खाररोड आणि गोरेगाव दरम्यान नवीन ६ वी रेल्वे लाईन (८.८० कि.मी.) उरण आणि खारकोपर दरम्यान उपनगरीय ईएमयू ट्रेनची सुरुवात, नमो अभियान-मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान, नारी शक्ती दूत ॲप लेक लाडकी योजनेतील लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप यांचा समावेश आहे.

यावेळी पंतप्रधान श्री. मोदी म्हणाले, आजचा दिवस केवळ मुंबई आणि महाराष्ट्रासाठीच नव्हे तर विकसित भारताच्या संकल्पाच्या ऐतिहासिक पुरावा आहे. भारतातील सर्वात लांब असलेल्या अटल सागरी सेतूचे लोकार्पण हा भारताचा विकासाप्रती असलेल्या वचनबध्दतेचा पुरावा आहे. २०१४ च्या निवडणुकीआधी रायगड किल्ल्यावर गेलो होतो, त्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन काही संकल्प केले होते. आज



ते संकल्प पूर्ण होताना दिसत आहेत. अटल सेतू त्याचाच एक भाग आहे. अटल सेतू ही विकसित भारताची एक झलक आहे. अटल सेतूमुळे गोवा देखील मुंबईच्या जवळ येणार आहे, अटल सेतू प्रकल्प पूर्ण करण्याचा संकल्प जपानचे माजी पंतप्रधान शिंझो बे यांच्या समवेत केला होता. सागरी सेतूचं काम पूर्ण होणं, हे मोठे यश आहे. देशासाठी गेल्या १० वर्षात पायाभूत सुविधांसाठी ४४ लाख कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी महाराष्ट्रात केंद्र सरकारने सुमारे ८ लाख कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण केले आहेत आणि आणखी काम सुरू आहे. ही रक्कम प्रत्येक क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधी वाढवित आहे, असेही ते म्हणाले. स्वच्छता, शिक्षण, वैद्यकीय मदत आणि रोजगाराशी संबंधित योजनांचा महिलांना सर्वाधिक फायदा झाला असल्याचे सांगून ते म्हणाले, देशात पीएम जनऔषधी केंद्रे, स्वनिधी, पीएम आवास आणि बचतगटांना मदत मिळून 'लखपती दीदी' तयार होत आहेत. २ कोटी 'लखपती दीदी' तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र शासनाच्या योजनाही याच दिशेने कार्यरत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि अजित पवारांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचा विकास गतीने सुरू आहे, शासन याच निष्ठेने महाराष्ट्राच्या विकासासाठी कार्यरत राहील, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्रातील नुकत्याच झालेल्या मेगा विकास प्रकल्पांची उदाहरणे देताना प्रधानमंत्री यांनी बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे उद्घाटन आणि नवी मुंबई विमानतळ आणि कोस्टल रोड प्रकल्पाची कामे सुरू आहेत, यामुळे मुंबईतील कनेक्टिव्हिटीचा चेहरामोहरा बदलेल. प्रवासाची सोय आणखी वाढविण्यासाठी इस्टर्न फ्री-वे च्या ऑरेंज गेट ते मरीन ड्राइव्हला जोडणाऱ्या भूमिगत रस्त्यात बोगदा तयार करण्यात येत आहे. लवकरच, मुंबईलाही पहिली बुलेट ट्रेन मिळेल, असेही ते म्हणाले. दिल्ली-मुंबई इकॉनॉमिक कॉरिडॉर महाराष्ट्राला मध्य आणि उत्तर भारताशी जोडेल. महाराष्ट्राला तेलंगणा, छत्तीसगड आणि इतर शेजारील राज्यांशी जोडण्यासाठी ट्रान्समिशन लाईनचे जाळेही टाकले जात आहे. तेल आणि वायू पाईपलाईन, नवी मुंबई विमानतळ आणि शेंद्रा-बिडकीन इंडस्ट्रियल पार्कचे मोठे प्रकल्प महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला नवी गती देणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. ■

## चार वर्षांत मेट्रो आणि रस्त्यांचं नेटवर्क - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



*उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, १९७३ मध्ये या सागरी सेतूची संकल्पना मांडली होती. मात्र ४० वर्षात हे काम झाले नाही, ते आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या दूरदृष्टीमुळे शक्य झाले आहे. या अटल सेतूसाठी पंतप्रधानांनी थेट एमएमआरडीएला कर्ज उपलब्ध करुन देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. मुंबईत कुठूनही ५९ मिनिटात पोहोचता आले पाहिजे. मेट्रो आणि रस्त्यांचं नेटवर्क त्या पद्धतीने तयार होत आहे. येत्या तीन ते चार वर्षांत असे नेटवर्क तयार होईल, असेही उपमुख्यमंत्री फडणवीसांनी यावेळी जनतेला सांगितले. यापुढे रायगड, नवी मुंबई हे नवे इंडस्ट्रियल हब असेल. येथे नवीन विमानतळ लवकरच पूर्ण होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शक्ती आमच्यामागे उभी असल्यामुळे राज्यातील पायाभूत प्रकल्प लवकर पूर्ण होतील, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.*




अटल सेतूचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले.



अटल सेतू बांधणाऱ्या श्रमिक, अधिकारी, कर्मचारी यांची आस्थेवाईकपणे विचारपूस करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी.



# महिलांनी विकसित भारताचे नेतृत्व करावे



> महाराष्ट्र हा विकसित भारताचा भक्कम आधारस्तंभ बनला पाहिजे, यासाठी केंद्र शासनामार्फत सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. तसेच येत्या काळात देशातील २ कोटी महिलांना लखपती बनविण्याचा केंद्र शासनाचा संकल्प असून विकसित भारत संकल्प अभियानामध्ये महिलांनी नेतृत्व करुन या अभियानाला यशस्वी करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**कन्या** आणि भगिनींच्या सक्षमीकरणाची मोदींची हमी महाराष्ट्र सरकार पुढे नेत आहे. मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण अभियान, नारी शक्तीदूत ॲप्लिकेशन आणि लेक लाडकी योजना यांसारख्या योजना त्या दिशेने प्रयत्न करत आहेत. महिलांनी पुढाकार घेऊन विकसित भारतच्या चळवळीचे नेतृत्व करणे खूप महत्त्वाचे आहे. आपल्या माता आणि कन्यांच्या मार्गातील प्रत्येक अडथळा दूर करून त्यांच्यासाठी जीवन सुलभ करणे याला आमच्या सरकारचे प्राधान्य आहे, उज्ज्वला, आयुष्मान कार्ड, जन धन खाती, पीएम आवास अंतर्गत पक्की घरे, मातृ वंदन योजना, २६ आठवड्यांची प्रसूती रजा आणि सुकन्या समृद्धी खाती यासारख्या योजनांद्वारे महिलांच्या गरजांची काळजी सरकारने घेतली आहे. महिला कल्याण ही कोणत्याही राज्यातील कोणत्याही दुहेरी इंजिन सरकारची सर्वात मोठी हमी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेल्या अटल सेतू लोकार्पणाच्या भव्य दिव्य कार्यक्रम ला ग्रामीण महिलांची प्रचंड गर्दी होती. महिलांचा उत्साह दिसून येत होता. महिलांच्या आसन व्यवस्थेकडे आयोजकांनी विशेष लक्ष दिले होते. उपस्थित महिला हौशेने एकाच रंगाच्या साड्या परिधान करुन आल्या होत्या. त्यांची दुर्दम्य इच्छाशक्ती व आशावाद हे विकसित महाराष्ट्राचे प्रतिबिंब होते. शासनाच्या योजना या केवळ कागदावरच न राहता शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत आहे, याचे उत्तम उदाहरण या निमित्ताने दिसले.

भडगाव, ता.वैजापूर जि.संभाजीनगर येथून आलेल्या वैशाली दीपक जगताप म्हणाल्या की, आम्ही जरी ग्रामीण भागात राहत असलो म्हणून काय झालं, आम्हालाबी आमच्या संसारात हातभार लावायचा हाय ग्रामीण भागात महिलांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. या अडचणी ओळखून सरकार आमच्या पाठीशी खंबीर उभं हाय, म्हणूनच आम्हाला सरकारकडून आर्थिक मदत मिळाली. त्यातून आम्ही बचतगट स्थापन केलाय. या बचत गटाच्या माध्यमातून गावातच वॉटर फिल्टर, दूध संकलन केंद्र चालू केले आहे. त्याचबरोबर कॉमन सर्विस सेंटर चालू करुन सगळया सुविधा या सेंटरमधून पुरवतो. त्यामुळे गावकऱ्यांना यांत्रिक साधने दुरुस्त करण्यासाठी बाहेर जावे लागत नाही. मायबाप सरकार खऱ्या अर्थाने आमचा आधार बनला आहे. ■

# असा आहे अटल सेतू



देशाच्या पायाभूत सुविधांच्या इतिहासात मानाचे पान म्हणून ज्याचा उल्लेख होईल अशा 'अटल सेतू'चे नुकतेच लोकार्पण झाले. डबल इंजिन सरकारमुळे काय होऊ शकते, याची प्रचिती या सेतूमुळे आली आहे.

**मुंबई** ट्रान्सहार्बर लिंकला (MTHL) आता 'अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू' असे नाव देण्यात आले आहे. डिसेंबर २०१६ मध्ये पंतप्रधान मोदींनी या पुलाची पायाभरणी केली होती. आज त्याचे उद्घाटनही ते करणार आहेत. अटल सेतू १७,८४० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करून बांधण्यात आला आहे.

हा पूल २१.८ किमी लांबीचा आणि ६ लेनचा आहे. १६.५ किमी लांबीचा मार्ग समुद्रावर बांधला आहे तर सुमारे ५.५ किमी जमिनीवर बांधला आहे. हा देशातील सर्वात लांब पूल आहे. हे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांना कनेक्टिव्हिटी प्रदान करतो. त्यामुळे मुंबई ते पुणे, गोवा आणि दक्षिण भारतात जाण्यासाठी लागणारा वेळही कमी होईल. यामुळे मुंबई बंदर आणि जवाहरलाल नेहरू बंदर यांच्यातील संपर्क सुधारेल.

**देशातील सर्वात लांब सागरी पुलाबद्दल १० खास गोष्टी**

- मुंबई ते नवी मुंबई हे अंतर अवघ्या २० मिनिटांत पार करता येईल. याआधी दोन तास लागत होते. अटल सेतू मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांच्या दरम्यान कनेक्टिव्हिटी देखील प्रदान करेल. मुंबई ते पुणे, गोवा आणि दक्षिण भारतातील प्रवासाचा वेळही कमी होईल.

- अटल सेतूच्या बांधकामात सुमारे १७७,९०३ मेट्रिक टन स्टील आणि ५०४,२५३ मेट्रिक टन सिमेंट वापरण्यात आले आहे. एमएमआरडीएचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी यांनी गुरुवारी देशातील सर्वात नवीन अभियांत्रिकी चमत्कार 'अटल सेतू' ची वैशिष्ट्ये सांगताना म्हटलं की, पुलाच्या बांधकामासाठी वापरलेले स्टील पॅरिसमधील आयफेल टॉवरच्या १७ पट आहे.

- हा पूल अत्याधुनिक तंत्रज्ञानाने आणि अनेक नवीन-युग वैशिष्ट्यांसह सुसज्ज आहे, ज्यामध्ये ऑर्थोट्रॉपिक स्टील डेकचा समावेश आहे. जे मोठे स्पॅन

देण्यास मदत करतात. सागरी जीवसृष्टीचे रक्षण करण्यासाठी आवाज आणि कंपन कमी करण्यासाठी नदीच्या अभिसरण रिंगचा देखील वापर करण्यात आला आहे. या पुलामध्ये वापरण्यात आलेले दिवे आजूबाजूच्या जलचर वातावरणात अडथळा आणणार नाहीत किंवा त्रास देणार नाहीत, असे अधिकाऱ्याने NI ला सांगितले.

▶▶अंदाजे १८,००० कोटी रुपये खर्चून बांधले गेले. ते पूर्ण झाल्यावर दररोज अंदाजे ७०,००० वाहने धावतील आणि हा पुल १०० वर्षे चालेल अशी अपेक्षा आहे.

▶▶चालकांना अटल सेतूवर ताशी १०० किमी वेगाने प्रवास करण्याची परवानगी असेल. सागरी सेतूवरून अवजड वाहने, दुचाकी, ऑटो रिक्षा, ट्रॅक्टर यांना परवानगी दिली जाणार नाही.

▶▶पुलाचा काही भाग फ्लेमिंगो संरक्षित क्षेत्र आणि भाभा अणुसंशोधन केंद्रातून जात असल्याने शिवडीपासून ८.५ किमी लांबीचा ध्वनी अवरोधक स्थापित करण्यात आला आहे.

▶▶२०१८ पासून हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी एकूण ५,४०३ मजूर आणि अभियंत्यांनी काम केले आहे. रायगड जिल्ह्यातील पनवेल ते दक्षिण-मध्य मुंबईतील शिवडी हे अंतर १५ किलोमीटरने कमी होईल, तर प्रवासाचा वेळ सुमारे दोन तासांवरून १५ ते २० मिनिटांवर येईल.

▶▶अटल सेतूची रचना मुख्य मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाशी जोडण्यासाठी करण्यात आली आहे, ज्यामुळे राज्यातील दोन मोठ्या शहरांमधील संपर्क अधिक वाढेल. यामुळे मुंबई बंदर आणि जवाहरलाल नेहरू बंदर यांच्यातील कनेक्टिव्हिटी देखील सुधारेल.

▶▶समुद्रसपाटीपासून १५ मीटर उंचीवर बांधलेला सागरी पूल हा बांधकामाचा सर्वात कठीण भाग होता. सागरी भागात, अभियंते आणि कामगारांना समुद्राच्या तळापर्यंत सुमारे ४७ मीटर खोदावे लागले.

▶▶टोल आकारणी २५० रुपये ठरवली आहे.

▶▶मोदीजींच्या नेतृत्वात देशाच्याबरोबरीने आता आमच्या मुंबईचा विकास होतोय. अटल बिहारी वाजपेयी सेतूमुळे नवी मुंबईकशी कनेक्टीव्हीटी वाढणार

▶▶मुंबईकरांना २५ वर्ष फक्त विकासाची स्वप्न दाखवली मात्र भाजप सरकारने खऱ्या अर्थाने मुंबईकरांना न्याय दिला. आज अटल सेतूमुळे मुंबईची चर्चा जगभरात

▶▶मुंबई मेट्रो, अटल सेतू, कोस्टल रोड आणि अनेक विकासकामे.

▶▶शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतू एकूण २२ किमी लांबीचा असून त्यातील १६.५० किमी भाग समुद्रामध्ये तर उर्वरित ५.५० किमी भाग जमिनीवर आहे. भारतातील सर्वांत मोठा सागरी सेतू तर जगातील १२व्या क्रमांकाचा सागरी सेतू. सागरी सेतूसाठी १८ हजार कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. हा भारतातील सर्वांत जास्त लांबीचा आणि जगभरातील दहाव्या लांबीचा पाण्यावरील समुद्रावरील पूल ठरणार आहे. हा सागरी सेतू मुंबई बंदर व जवाहरलाल नेहरू पोर्ट या दोन प्रसिद्ध बंदरांना जोडणारा आहे, तर मुंबई, नवी मुंबई, रायगड, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग तसेच मुंबई-गोवा महामार्ग यातील अंतर सुमारे १५ किमीने कमी झाले. यामुळे इंधन, वाहतूक खर्च आणि मौल्यवान वेळेत सुमारे एका तासाची बचत होणार आहे.

**अत्याधुनिक टोल योजना**

या सागरी सेतूवरून वाहन चालक जास्तीत जास्त १०० किमी प्रतितास वेगाने पुलावरून पुढे जाऊ शकतात. तसेच, भारतात प्रथमच 'अटल सेतू'साठी ओपन रोड टोलिंग प्रणाली वापरात येत आहे. ज्यामुळे पारंपरिक टोलनाक्यांवर होणारी वाहतूककोंडी टळेल. 'अटल सेतू'वर ऑस्ट्रेलियन कंपनीच्या माध्यमातून ४२७ कोटी रुपये खर्चून इंटेलेंजेस ट्रान्सपोर्टेशन सिस्टीमची अंमलबजावणी करण्यात आली. ज्यामध्ये कमांड कंट्रोल सेंटर, रोड लाईट्स, इलेक्ट्रिकल आणि युटिलिटी वर्क आणि १३३ कॅमेरे असलेली ओपन रोड टोलिंग प्रणालीचा समावेश आहे. ही सर्व कामे पॅकेजअंतर्गत करण्यात आले. यामध्ये कमांड सेंट्रल, प्रशासकीय इमारत, रोषणाई, उपयुक्तता, सुरक्षा, सेन्सर्स, कॅमेरा, टोलिंग इत्यादी समावेश आहे. पथकर वसुलीसाठी देशात, राज्यात पथकरनाक्याच्या माध्यमातून टोल वसुली होते. पण अनेक देशात अत्याधुनिक अशा ओपन रोड टोल प्रणालीच्या माध्यमातून पथकर वसुली केली जाते. या यंत्रणेत प्रचलित असे पथकरनाके नसतात किंवा पथकरनाक्यांवर वाहनांच्या रांगा नसतात. रस्त्यांवर काही निश्चित ठिकाणी अत्याधुनिक असे कॅमेरे लावण्यात येतात. हे कॅमेरे धावत्या वाहनांच्या नंबर प्लेट स्कॅन करतात. त्यानंतर तात्काळ संबंधित वाहनचालकांच्या किंवा मालकाच्या बँक खात्यातून पथकराची रक्कम वळती केली जाते. ■

# कष्ट, संयमाची फिनिक्स कथा !

● रघुनाथ पांडे

> प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा १३ जानेवारी रोजी वाढदिवस होता. यानिमित्ताने त्यांच्या संघर्षमय प्रवासाचा आढावा...



**पंजाबचे** राज्यपाल श्री. बनवारीलाल पुरोहित यांनी एका कार्यक्रमात एक प्रसंग ऐकविला. त्यानंतर संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या निनादात व्यग्र झाले होते. फारतर पंधरा दिवस झाले असतील. पुरोहित म्हणाले, हा प्रसंग म्हणजे कष्ट आणि संघर्षाचे जिवंत उदाहरण आहे.. जो मैंने स्वयं अनुभव किया और आपको बताया. मैंने हिरा देखा है.. बनवारीलालजी अर्थात बाबूजी म्हणजे एक कणखर आणि सव्यसाची संपादक. नागपुरातून प्रसिद्ध होणाऱ्या 'हितवाद'या इंग्रजी दैनिकाचे मुख्य संपादक राहिलेले चाणाक्ष पत्रकार! ते अनेक दशके पत्रकार, नागपूरचे खासदार आणि प्रभू श्री रामाच्या मुद्द्यावर काँग्रेस जनभावना तुडवत आहे असे लक्षात येताच खासदारकीचा व काँग्रेसचाही राजीनामा देणारे व्रतस्थ रामभक्त! त्यांनी सांगितलेला प्रसंग साधारणतः तीन दशकेआधीचा आहे.ते म्हणाले, अतिशय तीव्र आंदोलन करून स्वतः अमरावतीच्या सेंट्रल जेलमध्ये कारावास भोगून शेकडो पुनर्वसित बेरोजगार तरुणांना खापरखेडा, कोराडीच्या वीज प्रकल्पात नोकऱ्या दिल्या. हे कार्य हिऱ्यासारखे लखलखणारे आहे. यासाठी त्यांचे अभिनंदन करावे तितके कमी आहे. त्यांच्यामुळे घरोघरी चुली पेटल्या आणि शेकडो कुटुंबे स्थिर झाली.. मुलेबाळे शिकली, मोठी झाली. ते याच माणसामुळे!! मी त्यांच्या या संपूर्ण संघर्षाचा साक्षीदार आहे. बनवारीलालजी ज्या व्यक्तीबद्दल इतके मोकळेपणाने भरभरून बोलत होते, ती व्यक्ती म्हणजे श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्र भाजपाचे प्रदेश अध्यक्ष.

बाबूजी म्हणाले, महाराष्ट्राला लढवय्या नेता मिळाला ज्याचा अविश्रांत कष्ट हाच पाया आहे.!

श्री. बावनकुळे म्हणजे कल्पक, कष्टाळू आणि प्रयत्नांच्या परकाष्ठेत समरस होणारे आणि याबरोबरीने नियती, नशीब, संवाद व संपर्कावर अतूट श्रद्धा असणारे नेते! कमालीचे हळवे, कुटुंबवत्सलही. नावीन्याचा शोध घेण्याची वृत्ती, जिज्ञासा आणि पदार्थाची चव नेटकीच असावी यासाठी स्वयंपाक्याला किंवा शेफलाही काटेकोर सूचना देणारे आनंदी खवय्ये. जुन्या गाण्याचे दर्दी. 'गर्जा महाराष्ट्र माझा..' या गीतासाठी आग्रह धरणारे. आणि, देवदूर्लभ कार्यकर्ता हीच माझी शक्ती आहे, अशी पक्की धारणा असणारे नेते. त्यांना शेकडो वाढदिवस पाठ आहेत. त्यांना हजारो कार्यकर्त्यांची नावे मुखोद्गत आहेत. अमुक कार्यकर्त्याचे अमुक काम राहिले, म्हणून ते मनापासून पाठपुरावा करतात. दररोज शेकडो पत्रे लिहितात... दिवसभरात अनेकानेक फोनकॉल्स आणि दिवसभर ते रात्री झोपेपर्यंत किमान सहाशेवर मेसेजना उत्तरं देणे. कुणा कार्यकर्त्याने रील पाठवली, कुणी प्रवासाचा व्हिडीओ पाठवला की त्यांना सूचनेसह प्रतिसाद देण्याची विलक्षण हातोटी साधलेला किमयागार. कार्यकर्त्याने कितीही सेल्फी घेतल्या तरी खांद्यावर हात ठेवून त्याची इच्छा पुरवणे.. आणि जेवला का, कुठे मुक्काम आहे.. काही अडचण आहे का, कुणाला फोन करायचा का.. असे कितीतरी प्रश्न विचारून, समस्या निकाली काढून कार्यकर्त्याचा समाधानी चेहरा बघणे हाच प्रदेश अध्यक्षाचा दिनक्रम आहे. सकाळी

आठ ते रात्री एक इतका प्रदीर्घ काळ त्यांचा अविरत जनसंपर्क चाललेला असतो. ते थकत नाहीत. रात्री ते वाचन करतात.. लहानशा डायरीत दिवसभरातील महत्वाच्या आणि दुसऱ्या दिवसाच्या नोंदी करूनच त्यांचा दिवस संपतो.. हा दिवस कधी सतरा किंवा अठरा तासांचाही असू शकतो. ते प्रवासात झोपत नाहीत. त्या वेळात ते मोबाईलवरून सतत कार्यकर्ते, नेते, पदाधिकाऱ्यांशी संपर्कात असतात. झूमवरून कॉन्फरन्स करतात. बारीक सारीक सूचना देतात. ते वाद करत नाहीत. शांतपणे समजून घेतात व सांगतातही. कुणी ऐकत नसेल तर 'ये जेवायला...' असे गोडीने सांगतात आणि जेवणाच्या टेबलावर गुंता सुटलेला असतो. कार्यकर्त्याला हसतमुख बघणं, यासाठी माझे अध्यक्षपद आहे, असा शिरस्ता त्यांचा आहे.

गेले दीड वर्षे ते पायाला भिंगरी लावून फिरत आहेत. संपर्क व संवाद हाच पक्ष वाढीचा स्रोत आहे, ही त्यांची थिएरी. दीड वर्षांत तीन वेळा संपूर्ण महाराष्ट्र त्यांनी पिंजून काढला. कार्यकर्ते, पदाधिकारी, आमदार, खासदार, मंत्री यांचे परस्पर संबंध सौहार्दपूर्ण करण्यासाठी ते कोणताही प्रोटोकॉल पाळत नाहीत. मी प्रदेश अध्यक्ष आहे; त्यांनी माझ्याकडेच यावे.. मगच बोलू, निर्णय घेऊ हा प्रकार त्यांच्या स्वभावात नाही. प्रथम मी पक्षाचा कार्यकर्ता आहे, प्रदेश अध्यक्ष नंतर. या कार्यकर्त्यांनीच मला प्रदेशाध्यक्ष केले आहे.. इतके साधे लॉजिक बावनकुळे यांच्या राजकीय आयुष्याचे सार आहे. हा माणूस खूप कनवाळू आहे. सश्रद्ध आहे. 'जगदंब.. जगदंब' हा शब्द त्यांची शक्ती आहे. कोराडीच्या देवी महालक्ष्मीवर त्यांची भक्ती म्हणजे ऊर्जा आहे. ते म्हणतात, महालक्ष्मी मंदिराचा जीर्णोद्धार हेच माझ्या आयुष्याचे ध्येय होते.. तिच्या आशीर्वादाने पुढे जे घडले ती जनसेवा. जो कुणी हे मंदिर पाहील, ती व्यक्ती चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कल्पकतेला मनःपूर्वक दाद देईल. मंदिराची भव्यता, देखणेपण, कार्यशैली, नेटकेपण, स्वच्छता आणि आदरभाव इतका अपूर्व आहे, की तो अनुभवून बावनकुळे यांच्या व्यवस्थापन वकुबाची प्रशंसा करेल.

जागतिक वारसा लाभलेल्या भारतातील १७ सौंदर्य स्थळांपैकी एलिफंटा लेणी (घारापुरी बेट) येथे ७० वर्षात प्रथमच वीज पोहोचवण्यास ऊर्जा विभाग यशस्वी झाला तो बावनकुळे यांच्या अभ्यासूवृत्तीने व कल्पकतेने.! श्री. देवेंद्रजी फडणवीस हे मुख्यमंत्री असताना त्यांनी या बेटावर वीज पोहोचवण्याचा निश्चय केला. तेव्हा ऊर्जामंत्री असलेल्या श्री. बावनकुळे यांनी त्या दिशेने यशस्वी प्रयत्न केले. समुद्राखाली सात किलोमीटर केबल टाकण्याचा पर्याय अंतिम झाला. यामुळे घारापुरी बेटावरील ९५० लोकांना वीज पुरवठा शक्य झाला. त्यांच्या घरात पहिल्यांदा जेव्हा दिवा झगमगला त्यावेळी त्यांना दिवाळी असल्याचे वाटले.

जागतिक ऊर्जा अभ्यासात प्लाउ तंत्रज्ञान पध्दतीचा वापर केला असल्याचे बावनकुळे यांच्या लक्षात आले, तेंव्हा हे तंत्र याठिकाणी वापरावे असे त्यांनी ठरवले. आणि लेणी उजळली. एरवी सायंकाळी सहानंतर अंधारलेली ही जगप्रसिद्ध जागा या प्रयत्नाने उजळून निघाली व पर्यटनाला गती आली.

असाच एक प्रसंग मेळघाटातील दुर्गम भागातील अनेक गावात वीज पोचविण्याचा आहे. प्रसिद्ध समाजसेवक डॉ. रवींद्र कोल्हे यांनी ऊर्जामंत्री असलेल्या बावनकुळे यांना पत्र लिहिले की, वन्य जनावरांच्या तावडीतून सुटकेसाठी तसेच मेळघाटातील गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वीज मिळावी. केवळ पाच ओळींचे ते पोस्टकार्ड होते. बावनकुळे यांनी आपली संपूर्ण यंत्रणा आदिवासी विभागात पाठवली.. मेळघाटचा वीज पुरवठा प्लॅन तयार झाला. पण हा भाग इतका अरण्याने व्यापला आहे की, त्यातून वीजतारा नेण्यास वन व पर्यावरण विभाग राजी नाही, हे लक्षात आले. या उत्तराने बावनकुळे व्यथित झाले. त्यांनी स्वतः पाहणी दौरा केला आणि मेळघाटात मध्यप्रदेशातून वीज पुरवठा सुरु झाला. विजेचे जाळे विणले गेले. आजचा प्रकाशमय मेळघाट हा बावनकुळे यांच्या अभ्यासाचे फलित आहे. अशा अनेक घटनांचा पुंज बावनकुळे यांचे क्षितिज विस्तारतो.

मध्यंतरी काही वर्षे नियतीने त्यांची परीक्षा घेतली. त्यात ते उत्तीर्ण झाले. तीन वर्षापूर्वी प्रदेश सरचिटणीस आणि त्यानंतर दीड वर्षापूर्वी प्रदेश अध्यक्षपदाची माळ त्यांना मिळाली. मात्र हे दिसते तेव्हढे सोपे नव्हते. प्रदेशाध्यक्षांच्या राजकीय कारकीर्दीकडे पाहिले की, राजकीय जीवनात अग्रेसर व्हायचे असेल तर कष्ट, संघर्ष, निष्ठा, श्रद्धा, सबुरी आणि संयमाला पर्याय नाही, हेच लक्षात येते.

**(श्री. पांडे हे प्रदेशाध्यक्षांचे माध्यम प्रमुख आहेत.)**

# राजकीय कर्तृत्वशून्यतेची अटळ 'भैरवी'

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अलिकडेच दिलेल्या निर्णयाचे कायदेशीर मुद्यांनुसार यथासांग विच्छेदन, विश्लेषण आपआपल्या मगदुरानुसार होत आहे. या निकालातून जून २०२२ मध्ये राज्यात घडलेल्या सत्तांतरावर कायदेशीर शिक्कामोर्तब झाले आहे. उद्धव ठाकरे, संजय राऊत यांनी या निकाला विरोधात फोडलेला टाहो, केलेला आक्रोश अपेक्षितच होता. या निकालाचे कायदेशीर दृष्टीतून विवेचन करण्याचा हेतू नाही. या निकालातून उद्धव ठाकरे यांच्या राजकीय कर्तृत्वशून्यतेच्या चेहऱ्याची पुन्हा ओळख करून देण्यासाठी हा लेख प्रपंच आहे.

**उद्धव** ठाकरे यांच्या राजकारणातील प्रवेशाच्या क्षणापासून विधानसभा अध्यक्षांच्या निकाला पर्यंतच्या प्रवासाचा 'एमआरआय' काढल्यावर त्यांच्या राजकीय कर्तव्यशून्यतेचे ढिगभर दाखले मिळतील. उद्धव ठाकरे यांच्या या प्रवासाकडे पाहिल्यावर पेशवाईतील राघोबादादा आणि महाभारतातील दुर्योधन या व्यक्तीरेखांचे वारंवार स्मरण होते. अतीव सत्ताकांक्षा, कारस्थानांचा अंगभूत स्वभाव याचा मिलाफ असलेले उद्धव ठाकरे हे राघोबादादा आणि दुर्योधनाचे 'फ्यूजन' ठरतात. राघोबादादांनी पेशवाईची गादी मिळवण्यासाठी स्वकियांशी दगाबाजी करत थेट इंग्रजांशी हातमिळवणी केली. दुर्योधनाने आपल्या सख्ख्या चुलत भावंडांना कपटाने त्यांच्या हक्काच्या राज्यशकटापासून वंचित ठेवले. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचा राजकारणातील वैभवशाली वारसा कार्यकर्तृत्वाच्या चढत्या भाजणीने पुढे नेण्याऐवजी त्याची अधोगतीकडे कशी वाटचाल होईल याकडेच उद्धव ठाकरेंनी लक्ष दिले.



बाळासाहेब ठाकरे यांनी आपले पिताश्री प्रबोधनकार ठाकरे यांच्या सांगण्यानुसार मराठी माणसांसाठी लढणारी संघटना बांधली. ही संघटना बांधत असताना बाळासाहेबांनी प्रचंड संघर्ष केला. या संघटनेला मराठी माणसांच्या हिताकरीता कार्यरत असणारी व्यवस्था बनवताना बाळासाहेबांनी स्थानीय लोकाधिकार समितीसारख्या संस्थेच्या रूपातून नियोजनबद्ध मेहनत घेतली. प्रस्थापित व्यवस्थेशी दोन हात करताना साथीदारांच्या पाठीमागे संघटनेचे पाठबळ उभे केले. त्याच वेळी या संघटनेच्या माध्यमातून जोडला गेलेला सामान्य शिवसैनिक आपुलकी आणि ममत्वाच्या धाग्याने जपला. राजकारणात टिकण्यासाठी संघर्षाची तयारी , माणसं जोडणे, जपणे एवढे गुण पुरेसे नसतात, त्यासाठी अंगी राजकीय शहाणपणही लागतं. १९८० च्या दशकात हिंदुत्वाचा मुद्दा हाती घेताना बाळासाहेबांनी आपली राजकीय जाण किती पक्की होती, हे दाखवून दिले. १९८७ ची विलेपार्ले विधानसभा पोटनिवडणूक, १९८८ मधील छत्रपती संभाजीनगरची पहिली महापालिका निवडणूक यातून बाळासाहेबांनी हिंदुत्वाचा गजर केला. पुढे भाजपाबरोबर युती झाल्यानंतर राज्यभर प्रवास करताना शिवसेनेची पाळेमुळे ग्रामीण भागात रूजवण्यासाठी अथक मेहनत घेतली. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीआधी बाळासाहेबांनी मोटारीमधून प्रवास करत शरद पवार आणि त्यावेळच्या काँग्रेसविरोधात रान पेटवले होते. बाळासाहेबांच्या या राजकीय प्रवासाशी उद्धव ठाकरेंची तुलना केल्यावर हाती भलेमोठे शून्य लागते. एखाद्या

धनिकाच्या पोटी ऐदी, खुशालचेंडू पुत्र आल्यावर तो पित्याच्या लाखाचे बारा हजार करून टाकतो. उद्धव ठाकरेंनी नेमकं तेच ''करून दाखवलं''.

कोणत्याही पक्षाची संघटना बांधण्यासाठी जमीनीवर उतरून परिश्रम घ्यावे लागतात, हे उद्धव ठाकरेंच्या गावीही नसावे. 'असेल हरी, तर देईल खाटल्यावरी' या वृत्तीने राजकारणात वावरलात तर घरी बसण्याची वेळ येते. बाळासाहेबांच्या करिश्म्याच्या आणि पुण्याईच्या बळावर आपल्याला राजकारणात कायम टिकता येणार नाही, हे प्राथमिक शहाणपणही त्यांच्याकडे नव्हते. बाळासाहेबांनी राजकारणात जे काही स्थान मिळवलं ते स्वकष्टार्जित होते. बाळासाहेबांचा हा वारसा पुढे न्यायचा असेल तर आपल्याला त्याहीपेक्षा अधिक कष्ट उपसावे लागतील, राजकारणातले पेच-डावपेच शिकावे लागतील, जनतेसाठी प्रसंगी रस्त्यावर उतरून संघर्षाची पावले टाकावी लागतील, याची जाणीव न ठेवता आपल्याच कैफात, कोषात वावरणार्या उद्धव ठाकरेंनी वेगळ्या अर्थाने 'स्वमग्नतेचे' दर्शन घडवले. सामान्य शिवसैनिकांसाठी आणि सामान्य माणसांसाठीही बाळासाहेबांनी मातोश्रीचे दरवाजे सताड उघडे ठेवले होते. उद्धव ठाकरेंनी कार्यकर्ते आणि जनतेसाठी मातोश्रीचे दरवाजे बंद करताना आपल्या मनाची कवाडेही बंद करून टाकली होती. शिवसेनेच्या लोकप्रतिनिधींनाही या महाशयांना सहज भेटता येत नसे. बाळासाहेबांच्या काळातील कार्यकर्त्यांची पिढी कालपरत्वे अस्तंगत होत असताना तशीच फळी तयार करण्यासाठी आपल्याला हात-पाय हलवावे लागतील, हे ध्यानात न घेता उद्धव ठाकरे आयत्या पीठावर रेघोट्या मारत बसले. या कर्तृत्वशून्यतेची परिणती संघटनेची मजबूत रचना हळूहळू कमकुवत होण्यात झाली. शिवसेनेचा ब्रँड पाठिशी असल्यामुळे जिल्हा-जिल्ह्यातील सामान्य कार्यकर्त्यांनी लढाऊपणे आपलेही समांतर अस्तित्व निर्माण केले.

संघटना बांधणीसाठी राज्यभर कधीच न हिंडलेल्या उद्धव ठाकरेंचे राजकारणात येण्यामागचे प्रयोजनच कळेनासे होते. २०१४ मध्ये भाजपाबरोबरचा जागा वाटपाचा तिढा दोन-चार पावले मागे घेत सोडवण्याचा व्यवहारीपणाही त्यांनी दाखवला नाही. ''युतीत आम्हीच मोठे भाऊ, तुम्हाला एकही जागा जास्तीची देणार नाही, '' असे म्हणणाऱ्या उद्धव ठाकरेंना राजकारणात टोकाच्या अहंकाराला जागा नसते, हे कधीच कळले नाही. २०१७ च्या मुंबई महापालिका निवडणुकीत त्यांच्या ताकदीचा फुगा पुरता फुटला. मुंबईची सत्ता राखताना त्यांची दमछाक झाली. तरीही त्यांचा तोरा बदलला नाही.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर त्यांची अनेक वर्षाची मुख्यमंत्रीपदाची लालसा उफाळून आली. दगाबाजीच्या कर्माने मुख्यमंत्रीपद मिळवल्यानंतर चांगला कारभार करून आपले राजकारणातील स्वतंत्र स्थान निर्माण करण्याची बुद्धीही त्यांना झाली नाही. महाविकास आघाडीच्या मंत्र्यांनाही न भेटणारे उद्धव ठाकरे लहरी महंमदापेक्षाही बेपर्वा झाले होते. स्वपक्षाच्या आमदारांनाही दुर्मिळ झालेले उद्धव ठाकरे २०१९ ते २०२२ या काळात राजकारणातील कालबाह्यतेकडे वाटचाल करू लागले होते. जून २०२२ मध्ये सहकार्यांनी या बेपर्वाई विरोधात निशाण उभे केल्यावरही उद्धव ठाकरेंना जाग आली नाही. ही कर्तृत्वशून्यता आजच्या त्यांच्या अवस्थेस कारणीभूत ठरली आहे. आता भविष्यात मातोश्री बाहेर पडून संघटना बांधण्याची धमक त्यांच्यात नाही. ज्या सुभेदारांनी स्वतःच्या बळावर आपल्या सुभेदाऱ्या राखल्या आहेत त्यांना उद्धव ठाकरेंच्या सहाय्याची गरज नाही.

बाळासाहेबांनी निर्माण केलेला झंझावात उद्धव ठाकरेंना पुन्हा निर्माण करता येईल, असे स्वप्न संजय राऊतही पाहत नसतील. त्यांच्या राजकीय कुंडलीकडे पाहिल्यावर हा गृहस्थ राजकारणात का आला व त्याला काय साध्य करायचे होते, या प्रश्नाचे उत्तर काही केल्या मिळत नाही. विधानसभा अध्यक्षांच्या निकालानंतर त्यांना शिव्याशाप देत आदळआपट करून उद्धव ठाकरेंनी आपण गतकाळातून काहीच शिकलेलो नाहीत, हे जगजाहीर केले आहे. विचार, संपत्ती, कर्तृत्व, कला याचा वारसा टिकवणे हे येऱ्या-गबाळ्याचे काम नाही. उत्तुंग वारसा लाभलेल्या अनेकांना तो वारसा पुढे नेता आलेला नाही. बिजू पटनाईक यांचे चिरंजीव नवीन पटनाईक यांनी आपल्या पिताश्रींचा वारसा कार्यकर्तृत्वाने आणखी समृद्ध केला. जगमोहन रेड्डीसारख्या युवा नेत्याने काँग्रेसमधून बाहेर पडत, प्रवाहाच्या उलट्या दिशेने जात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. उद्धव ठाकरेंनी काय कमवले आणि काय गमवले, याचा हिशोब मांडायला बसल्यावर गोळाबेरीज कर्तृत्वाच्या शून्यापाशी येऊन संपते. दैव देते आणि कर्म नेते असं आपल्याकडे म्हणतात. यांच्याबाबतीत दुष्कर्माने मिळवलं आणि कर्मानेच घालवलं, असं म्हणण्यावाचून पर्याय नाही. ■

# महाराष्ट्रातील सौरक्रांती

● विश्वास पाठक

हे अभियान ग्रामीण भागामध्ये शेतीला दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करून परिवर्तन करण्यासोबतच ग्रामीण भागासाठी अन्य कारणांसाठीही लाभदायक ठरेल. ज्या ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात असे सौर उर्जा प्रकल्प उभारले जातील त्यांना प्रकल्प सुरू झाल्यानंतर तीन वर्षांसाठी प्रति ग्रामपंचायत पाच लाख रुपये प्रोत्साहनात्मक मदत देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामपंचायतींना यातून सुमारे २०० कोटी रुपये मिळतील. अर्थात, या अभियानामुळे ग्रामीण भागात शेतीसाठी विजेची उपलब्धता सुधारणे, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणे आणि गावाच्या विकासाला हातभार लागणे असा तिहेरी लाभ अपेक्षित आहे.

**देवेंद्र फडणवीस यांच्या चातुर्याचा प्रकाश**

शेतकऱ्यांसाठीचा प्रश्न सोडविण्यासाठी चालू केलेली ही योजना म्हणजे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चातुर्याचे उदाहरण आहे. शेतकऱ्यांसाठी सात हजार मेगावॅट वीज निर्मिती होईल पण त्यासाठीची गुंतवणूक खासगी गुंतवणूकदार करतील. मोठ्या प्रमाणात जमीन लागेल पण जी शासकीय जमीन तशीही पडीक आहे तिचा वापर शेतकऱ्यांसाठी होईल. राज्य सरकार पाच वर्षात सवलती आणि अनुदानावर १२३४ कोटी रुपये खर्च करेल पण त्या बदल्यात सरकारला उद्योजकांकडून करापोटी २४७८ कोटी रुपये मिळतील. मुख्य म्हणजे खासगी



गुंतवणुकीतून शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा करताना प्रकल्प कालावधीत औद्योगिक व व्यापारी ग्राहकांवरील वीस हजार कोटी रुपयांचा क्रॉस सबसिडीचा बोजा कमी होईल.

राजकीय इच्छाशक्ती असेल तर सरकारचा पैसा खर्च केल्याशिवायच प्रश्न कसा सुटतो आणि तो सोडविताना अनेक घटकांना कसा लाभ होतो याचे मुख्यमंत्री सौर कृषी योजना-२.० हे उदाहरण आहे. उपमुख्यमंत्र्यांच्या चातुर्याचा प्रकाश शेती, उद्योग आणि एकूणच राज्यातील अर्थकारण उजळणारा आहे. या क्षेत्रासाठी ही गेमचेंजर योजना आहे. या योजनेमुळे राज्याची सौर ऊर्जा निर्मिती क्षमता मोठ्या प्रमाणात वाढेल जी भविष्यकाळासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांना लाभ होण्यासोबत राज्यातील उद्योगांसाठीच्या वीजदरात भविष्यात कपात झाल्यामुळे उद्योगांना अधिक चालना मिळेल. शेतकऱ्यांना सवलतीत वीज देण्यासाठीचा सरकारवरील अनुदानाचा बोजा कमी होईल व त्यासोबत महावितरण ही सरकारी वीज कंपनी आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होईल. या सोबत पर्यावरण रक्षणासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. कोळसा जाळून वीज निर्माण करण्याच्या ऐवजी सौर ऊर्जा वापरून वीज निर्माण करण्याच्या या ७ हजार मेगावॅटच्या योजनेमुळे एक कोटी मेट्रीक टन कार्बनडाय ऑक्साईडचे उत्सर्जन टाळले जाईल. अशी ही बहु उपयोगी योजना राज्यात साकारली जात आहे, हे सर्वांसाठी अभिमानास्पद आहे.

**(श्री. पाठक हे प्रदेश प्रवक्ते असून 'महावितरण'चे स्वतंत्र संचालक आहेत.) (समाप्त)**

# मोदी सरकारने केले आरोग्य व्यवस्थेत क्रांतीकारी बदल

● डॉ. राधेश्याम चौधरी




> गेल्या नऊ वर्षांमध्ये मोदी सरकारने आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण, नवीन पायाभूत सुविधांची निर्मिती, आरोग्य सेवेमध्ये तंत्रज्ञानाचा वापर, वैद्यकीय महाविद्यालयांची निर्मिती, रोग प्रतिबंधक लसीकरण, उपचारांसाठी मोफत आरोग्य विम्याचे कवच, प्रसंगी थेट आर्थिक मदत, कमी किमतीत जेनेरिक दर्जेदार औषधे पुरवणारी जन औषधी केंद्रे आदी महत्त्वपूर्ण पावले उचलून १४० कोटी जनतेचे आरोग्य रक्षण व संवर्धन करण्यासाठी अत्यंत महत्वाकांक्षी उपाययोजना अल्पावधीत करत अद्भुत व अकल्पनीय असे कवच तयार केलेले आहे.

**देशातील** प्रत्येक नागरिकाला दर्जेदार व परवडणारी आरोग्य सेवा सहज उपलब्ध झाली पाहिजे यासाठी मोदी सरकारने गेल्या ९ वर्षात अनेक प्रशंसनीय पाऊले उचललेली आहेत. अल्प उत्पन्न असलेली ग्रामीण भागातील बहुसंख्य कुटुंबे दुर्धर आणि मोठ्या आजारांच्या उपचाराच्या खर्चाचा आर्थिक भार पेलण्यास सक्षम नसतात. त्यामुळे ती कुटुंबे उपचाराच्या खर्चामुळे एक तर कर्जाच्या विळख्यात सापडतात किंवा पैशाच्या अभावी उपचारास मुकतात. कॅन्सर, हृदयाचे आजार व अनेक दुर्धर आजारांवर मोफत किंवा अल्प दरामध्ये उपचाराची व्यवस्था होऊ शकेल व पैशाअभावी कोणत्याही नागरिकाचे उपचार थांबून त्याच्या वेदना वाढू नये किंवा त्याच्या जीवाला धोका होऊ नये यासाठी अनेक पावले उचलण्यात आलेली आहेत. आयुष्यमान भारत नावाने मोदी सरकारने जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना आपल्या नागरिकांसाठी काढली आहे. साडेदहा कोटी कुटुंबांना लाभान्वित करणाऱ्या या आरोग्य विमा योजने द्वारे आतापर्यंत जवळपास साडे चार कोटी रुग्णांचे मोफत उपचार झाले.

आयुष्मान भारत या जन आरोग्य विमा योजनेद्वारे प्रत्येक कुटुंबाला वार्षिक पाच लाख रुपयांचे खाजगी रूग्णालयामधे उपचारासाठी आरोग्य सुरक्षा कवच देणाऱ्या २२ कोटी आयुष्यमान भारत कार्डपैकी साडे चार कोटी रुग्णांच्या उपचारातून जवळपास ५४ हजार कोटी एवढ्या मोठ्या रक्कमेची देश वासियांची बचत झालेली आहे. आजमितीला २७ कोटीहून अधिक आयुष्मान भारत खाती उघडण्यात आलेली आहेत.

२२५ नवीन वैद्यकीय महाविद्यालये व १५ एम्स यांच्या निर्मितीमुळे वैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये जवळपास ७० हजारच्या आसपास नवीन जागांची भर, वृद्धी या नऊ वर्षांमध्ये मोदी सरकारच्या कार्यकाळात झालेली आहे.

कोरोना काळामध्ये अनेक प्रगत देशांच्या आरोग्य व्यवस्था अक्षरशः कोलमडल्या होत्या. सगळ्या जगातील वैद्यकीय क्षेत्र गोंधळलेलं होतं. कोविड-१९ च्या उपचाराचं आव्हान पेलताना स्वदेशी पीपीई किटची उत्पादन,






ऑक्सिजन बेड्स, आयसीयु बेड्स, व्हेंटिलेटरचा पुरवठा, उपचारासाठी लागणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील नवीन औषधांची निर्मिती या सर्व आघाड्यांवर अत्यंत कमी वेळामध्ये भारताने यश मिळवले. एवढच नाही तर संशोधकांना सर्व पाठबळ देवून कोविड प्रतिबंधक लस देशातच बनवून नागरीकांच रक्षण केल.

● कोविड १९ लसीकरण करतांना अपॉइंटमेंट, नोंदणी व प्रमाणपत्र डिजिटल प्लॅटफॉर्म वरून देणारा भारत हा एकमेव देश ठरला आहे.

● एका वर्षाच्या विक्रमी वेळामध्ये १५० कोटी कोरोनाच्या लसींच्या मात्रा आपण दिल्या तर दीड वर्षांमध्ये जवळपास २२० कोटी कोरोनाच्या लसींच्या मात्रा देशवासियांना देण्यामध्ये आपण यशस्वी झालो. पूर्वी जगाकडे हात फैलवून मदत मागणाऱ्या भारताने १००हून जास्त देशांना २९ कोटी कोविड प्रतिबंधक लसींच्या मात्रा मोफत पोहोचवल्या. कोविडच्या काळामध्ये अत्यंत कमी वेळात मोदींच्या नेतृत्वात आरोग्य व्यवस्थेने कात टाकली.

● गेल्या नऊ वर्षांमध्ये देशभरामध्ये सर्वांना परवडतील अशा कमी किमतीत दर्जेदार जेनेरिक औषधे पुरवणारी जवळ पास दहा हजार जन औषधी केंद्र सुरू झाली आहेत. या जन औषधी केंद्राच्या माध्यमातून औषधी उपलब्ध करून तीन कोटीहून अधिक नागरिकांची जवळपास २३ हजार कोटींची आर्थिक बचत केलेली आहे. महागड्या कृत्रिम सांधे, स्टेंट, महागडी औषधे व वैद्यकिय साहित्य




यांच्या किंमतीवर नियंत्रण आणून नागरीकांना मोठा दिलासा देण्याच काम मोदी सरकारने केलय.

● मिशन इंद्रधनुष्य अंतर्गत जवळपास साडेचार कोटी बालके आणि सव्वा कोटी गर्भवती महिलांना १२ हजारांपासून सुरक्षेचे कवच प्रदान करण्यात आलेल आहे.

● अद्ययावत सुविधायुक्त १.५९ लाखाहून अधिक आयुष्मान भारत आरोग्य आणि स्वास्थ्य केंद्र नव्याने सुरू करण्यात आलेली आहेत.

● सरकारच्या कार्यकाळामध्ये आरोग्य सेवांमध्ये झालेल्या सकारात्मक परिवर्तनामुळे गेल्या नऊ वर्षांमध्ये माता मृत्यू दर प्रती एक लाख जीवंत जन्माला १३० वरून ९७ पर्यंत घटलेला आहे.

● देशाच्या कानाकोपऱ्यातील दुर्गम भागातील जवळपास १५ कोटी नागरिकांना टेली कन्सल्टेशनच्या माध्यमाने तज्ज्ञ व विशेषज्ञ डॉक्टरांच्या वैद्यकीय सेवा आतापर्यंत मोदी सरकारद्वारे पुरवण्यात आलेल्या आहेत.

● एकंदरीत प्रत्येक नागरिकाला फायदेशीर ठरतील अशा अनेक नीती राबवून आपल्या साफ नियतची साक्ष मोदी सरकारने भारताच्या आरोग्यव्यवस्थेमधे क्रांतिकारी परिवर्तन घडवून देशवासियांना दिली आहे. देशाच्या सर्वकष प्रगतिसाठी देशवासियांच शारीरीक, मानसिक आरोग्य उत्तम राखणे याला सरकार प्राथमिकता देते याचा प्रत्यय सरकारच्या धोरणातून येतोय असं म्हणावंच लागेल.

**(डॉ. चौधरी हे आय एम ए.जळगावचे माजी सचिव असून पक्षाचे जळगाव लोकसभा निवडणूक प्रमुख आहेत.)**

# मार्च 2024 पर्यंत 'खेलो इंडिया' अंतर्गत एक हजार खेलो इंडिया केंद्राची स्थापना करणार







**पूर्वी** क्रीडा अर्थसंकल्प केवळ ८०० कोटी रुपयांचा होता तो केंद्र सरकारने आता जवळपास ३,२०० कोटी म्हणजे चार पट केला आहे. येत्या दोन महिन्यात म्हणजेच ३१ मार्च २०२४ पर्यंत आपण देशभरामध्ये खेलो इंडिया योजनेअंतर्गत एक हजार खेलो इंडिया केंद्राची स्थापना करणार असून या खेलो इंडिया केंद्राच्या संचालनाची जबाबदारी जे चॅम्पियन ऍथलेट आहेत त्या माजी खेळाडूंना देण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री तसेच केंद्रीय माहिती प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी नागपूर मध्ये केली.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या खासदार क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन नागपुरातील यशवंत स्टेडियम येथे केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी प्रामुख्याने उपस्थित होते. देशातील खेळाडूंच्या कामगिरीबद्दल बोलताना अनुराग ठाकूर यांनी सांगितले की काही वर्षांपूर्वी देशांमध्ये क्रीडा अनुकूल वातावरण नव्हते परंतु आता एशियन गेम्समध्ये पदकांची शतकपूर्ती करून भारताने आपला कीर्तिमान स्थापन केला आहे. मल्लखांबसारख्या महाराष्ट्रातील पारंपारिक खेळांना तसेच देशातील इतर पारंपारिक खेळाच्या खेळाडूंना राष्ट्रीय तसेच खेलो इंडिया गेम्सचा भाग बनवले आहे. या पारंपारिक खेळांना आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील आपण नेणार असून या खेळांना ऑलंपिकमध्ये स्थान देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी यावेळी नमूद केलं. आंतरराष्ट्रीय स्तरावर विदर्भातील खेळाडूंना सहभागी करण्यासाठी स्पोर्टस ॲथॉरिटी ऑफ इंडियाच्या माध्यमातून सिलेक्टर या ठिकाणी पाठवून येथील स्थानिक प्रतिभा ओळखून त्या खेळाडूंना स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या शिबिरांमध्ये नेण्यात येईल आणि त्यांना चांगले प्रशिक्षण दिले जाईल असे देखील ठाकूर यांनी स्पष्ट केलं. खेळाडूंना मीडिया सोशल मीडियाच्या माध्यमातून मंच मिळणे, मानसन्मान मिळणे, त्यांना हातभार लावण्यासाठी अर्थसहाय्य मिळणे अश्या सर्व संधी एकत्रितरित्या खासदार क्रीडा महोत्सवात मिळत असल्याचेही ठाकूर यांनी यावेळी सांगितले. या खासदार क्रीडा महोत्सवामध्ये सादर करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक केले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना सांगितलं की गेल्या पाच वर्षापासून या क्रीडा महोत्सवामध्ये भाग घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. यावर्षी जवळपास ६५ हजार खेळाडू सहभागी झाले. ■



**मुंबई– मकर संक्रांतीनिमित्त माजी आमदार अतुल शाह यांनी ८ बाय ८ फुट राम मंदिराचे छायाचित्र असलेला मोठा पतंग उभारून पतंगोत्सव साजरा केला. उपस्थिती–** मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, संजीव पटेल, जमीलभाई शेख, रफिक भाई, तबरेज मेनन आदी.




**पुणे– क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शिक्षिका, उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्यांचा पुस्तके देऊन सत्कार– उपस्थिती–** ओबीसी मोर्चा महिला प्रदेश अध्यक्ष डॉ. उज्वला हाके, ओबीसी मोर्चा पुणे शहर सरचिटणीस स्मिता गायकवाड आदी.




**मुंबई– आयुष्मान भारत प्रकोष्ठतर्फे आयुष्मान भारत कार्डची ई–केवायसी करण्यासाठी व नोंदणी करण्यासाठी शिबिराचे आयोजन– उपस्थिती–** ज्येष्ठ नेते सुनील कर्जतकर, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, प्रदेश कार्यालय सहसचिव भरत राऊत, प्रकोष्ठ संयोजक सतिश तळेकर आदी.




**मुंबई- ख्रिश्चन समाजाची बैठक- उपस्थिती-** आ.प्रसाद लाड, ख्रिश्चन आघाडी प्रमुख राहुल बजाज, अल्पसंख्याक मोर्चा उपाध्यक्ष सलीम बागवान, अन्वर पठाण, नजीब पठाण, ज्युलियन जॉन, मुकुंद बोरे, थॉमस फर्नांडिस आदी उपस्थित होते.




**नांदेड- वैद्यकीय आघाडीतर्फे भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णसेवा अभियान प्रशिक्षण वर्ग- उपस्थिती-** खा. प्रताप पाटील-चिखलीकर, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अजित गोपछडे, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, नांदेड महानगर अध्यक्ष प्रविण साले, वैद्यकीय आघाडी प्रदेश संयोजक डॉ. बाळासाहेब हरपळे, डॉ. मनिषा जाधव, डॉ. सुनील चव्हाण, डॉ.स्वप्नील मंत्री आदी.



**सांगली- नमो चषक- बॅडमिंटन स्पर्धा- उपस्थिती-** आ. सुधीर गाडगीळ, सिद्धार्थ गाडगीळ, बॅडमिंटन संघटनेच्या माणिक परांजपे, पारिजात नातू, राजेश रोचलानी, शांतनू सारडा, सचिन बावडेकर आदी.

# प्रदेशाध्यक्षांचा लोकसभा प्रवास




**मुंबई उत्तर पूर्व– उपस्थिती–** मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, मुंबई सरचिटणीस संजय उपाध्याय, खा. मनोज कोटक, आ. राम कदम, आ. पराग शाह, अशोक रॉय, भालचंद्र शिरसाट, दीपक दळवी, अनिरुद्ध गोडसे आदी.




**उत्तर मध्य मुंबई– उपस्थिती–** मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, मुंबई सरचिटणीस संजय उपाध्याय, खा. पूनम महाजन, आ. पराग अळवणी, वीरेंद्र म्हात्रे, सुषम सावंत, सुहास अडिवरेकर आदी.




**उत्तर मुंबई– उपस्थिती–** प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, मुंबई सरचिटणीस संजय उपाध्याय, खा. गोपाळ शेट्टी, आ. योगेश सागर, लोकसभा निवडणूक व्यवस्थापन समिती संयोजक प्रविण दरेकर, जिल्हाध्यक्ष गणेश खणकर, सुहास अडिवरेकर, राजेश सिंग आदी.

# प्रदेशाध्यक्षांचा लोकसभा प्रवास





**दक्षिण मुंबई– उपस्थिती–** मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष संतोष मेढेकर आदी.




**नाशिक–दिंडोरी– उपस्थिती–** केंद्रीय आरोग्य राज्य मंत्री डॉ. भारती पवार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, आ. राहुल अहेर, आ. देवयानी फरांदे, आ. सीमा हिरे, आ. राहुल ढिकले, ग्रामीण जिल्हाध्यक्ष प्रशांत जाधव, गिरीश पालवे आदी.





**पुणे– उपस्थिती–** उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ नेते प्रकाश जावडेकर, शहराध्यक्ष धीरज घाटे, जगदीश मुळीक आदी.




**डॉ.अश्विनी बोरस्ते यांची महिला मोर्चा उपाध्यक्षपदी नियुक्ती– उपस्थिती–** महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, चित्रलेखा माने–कदम आदी.



**पुणे– संपर्क से समर्थन–** चित्रपट वितरण व प्रसिद्धी क्षेत्रातील ख्यातनाम व्यक्तीमत्व विनोद सातव यांची भेट.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com